




# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७७ । मंगळवार, दि.२१ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com







# अश्रूधुराच्या नळकांड्या अन् विद्यार्थ्यांच्या नडघ्या फोडल्या!

## संसदेवरील आंदोलन क्रूरतेने थोपविले; मात्र दडपू शकले नाही, देशभरातून विद्यार्थ्यांना समर्थन तर पोलिसांच्या हल्ल्याचा निषेध

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सीजेपी अर्थात कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा मोर्चा संसदेवर धडकला. यामुळे सुरक्षा दालांनी आक्रमक पवित्रा घेत विद्यार्थ्यांवर अक्षरशः हल्ला चढविला. अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे डोके आणि नडघ्या फोडल्या. मोबाईल जामर वाढवण्यात आले. नवी दिल्ली परिसरात इंटरनेट बंद केले. एकूणच विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्यासाठी दिल्ली पोलीस यंत्रणेने हवे तेवढे सर्व प्रयत्न केले. मात्र विद्यार्थ्यांचे आंदोलन ते चिरडू शकले नाही. देशभरातून या आंदोलनाला मोठा पाठिंबा उभा राहिला. विद्यार्थ्यांप्रती पोलिसांच्या क्रूर वागणुकीचा सर्वत्र निषेध करण्यात आला.

सोनम वांगचुक यांनी रुग्णालयातही उपोषण सुरूच ठेवले. सीजेपीचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली जंतर-मंतरवर शांततापूर्ण आंदोलन सुरूच राहिले. दरम्यान, विद्यार्थ्यांचे आंदोलन चीघळत असताना विरोधी पक्षांनी संसदेत सरकारला धारेवर धरले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बैठकांचा धडाका लावला. रात्री उशिरापर्यंत सरकार शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या निर्णयापर्यंत आल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. कॉकरोच जनता पार्टीने संसदेवर मोर्चा काढायचे ठरवले होते. मात्र, दिल्ली पोलिसांनी जंतरमंतरवरील आंदोलकांना जागेवरच रोखून धरले आहे. जंतरमंतरवरुन एकाही आंदोलकाला बाहेर पडून देण्यात आले नव्हते. देशभरातून जंतरमंतरवरील आंदोलनात सहभागी होण्यासाठी अनेकजण दिल्लीत येत आहेत. यापैकी आंदोलकांचा एक गट थेट संसद भवनाच्या दिशेने गेला. त्यामुळे संसदेच्या परिसरात एकच गोंधळ उडाला. हे आंदोलक संसदेच्या गेटजवळ पोहचले. त्यामुळे संसद भवनातील पूर्ण सुरक्षा यंत्रणा हायअलर्टवर कारण्यात आली होती. दिल्ली पोलिसांकडून अत्यंत अमानुष पद्धतीने बळाचा वापर करण्यात आल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे एकंदरीतच काही आंदोलकांनी 'आम्हाला मारा, आम्हाला मारा'

(उर्वरीत पान ४ वर)

### मी उपोषण सुरु ठेवतोय : सोनम वांगचुक

कॉकरोच जनता पार्टीच्या मोर्चावर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आल्याने सोनम वांगचुक व्यथित झाले. रुग्णालयातून त्यांनी टिशू पेपरवर लिहून एक संदेश आंदोलन करताना पाठविला. त्यात २३ व्या दिवसानंतरही आपण उपोषण सुरू ठेवणार असल्याचे म्हटले आहे. शांततापूर्ण मार्गाने विरोध करणाऱ्या युवकांसोबत ज्या प्रकारे क्रूर पद्धतीने वागले गेले, ते पाहता जोपर्यंत युवकांच्या नेत्यांना संसद भवनात खासदारांना भेटण्याची परवानगी मिळत नाही, तोपर्यंत उपोषण सुरु ठेवणार असल्याचे वांगचुक यांनी म्हटले आहे.

### पुरुष पोलिसांनी मुलींवर लाठीचार्ज केला...

हे सरकार नीटच्या २० विद्यार्थ्यांचा जीव घेतल्यानंतर देखील समाधानी नाहीत. आता त्यांना दुसऱ्यांचे रक्त सांडाईची इच्छा आहे. पोलिसांनी महिला आंदोलकांवर लाठी हल्ला केला. सरकारकडन गुंडागर्दी सुरु आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला. दरम्यान, दिपके यांच्यासह सौरव दास, आशुतोष रांका आणि सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अजून जंतर मंतरवर धरणे आंदोलन करत आहेत. ते सर्व जण केरळ हाऊस समोर आहेत. शांततापूर्ण विरोध संपणार नाही, असे सीजेपीकडून सांगण्यात आले.

### आंदोलकांना करंटचे झटके...

दिल्ली पोलिसांनी सकाळीच मोर्चाला सुरू होण्यापूर्वी बळाचा वापर करताना अमानुष मारहाण केली होती. त्यानंतर आंदोलकांना करंट सुद्धा दिल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. अनेक आंदोलकांनी बॅरिकेड्सना हात लावल्यानंतर करंट बसल्याचा गंभीर आरोप केला. या संदर्भात काही पत्रकारांनी पोलिसांना विचारला असता पोलिसांनी त्यावरती कोणतही उत्तर न देता 'बाजूला व्हा, बाजूला व्हा' अशा पद्धतीने उत्तर दिली. त्यामुळे दिल्लीमध्ये दिल्ली पोलिसांची दमनशाही सुरू आहे का? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### चर्चा झाली... आंदोलन मागे घ्यावं

आंदोलन मागे घ्यावं, जनजिवन पुर्वरत करण्यासाठी पोलीसांना मदत करावी असे जे पी नड्डा म्हणाले. आंदोलकांकडून सरकारकडे चर्चेचा आज पहिला प्रस्ताव आला आहे. सकाळी ११.५० पासून आमची आंदोलाकांसोबत चर्चा सुरू आहे असे नड्डा म्हणाले. आंदोलकांसोबत बैठक पार पडली आहे. शिष्टमंडळासोबत व्यवस्थीत चर्चा झाली आहे असे नड्डा म्हणाले. आंदोलकांकडुन दुपारी ४ वाजता निवेदन देण्यात आले आहे - जे पी नड्डा





# शिर्डीत फळ विक्रेत्या महिलेची हत्या

## नशेखोर तरुणींच्या टोळीकडून चाकूहल्ला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** काल दि १९ रोजी रात्री आठच्या सुमारास मागील वादाच्या कारणावरून साई मंदीर क्रमांक चार समोर फुटपाथवर काकडी व कैरी विक्री करणाऱ्या २९ वर्षीय महिलेवर तिच्या ओळखीच्या दोन तरुणींनी चाकू हल्ला करत निर्घृण हत्या केल्याचा खळबळजनक प्रकार शिर्डीत घडला आहे. मयत महिलेचे नाव जयश्री साईनाथ क्षिरसागर वय २९ असून ती व तिचा पती मोलमजूरी करून प्रपंच चालवत होते. काल सायंकाळी साडे आठच्या सुमारास ती महीला नेहमी प्रमाणे गेट क्रमांक चार समोर काकडी व कैरी विकत असताना तिच्या ओळखीची फिजा उर्फ नोझीया लुकमान पटेल (रा. कालिकानगर, शिर्डी) हिने चाकुने पोटावर, पायावर, मांडीवर जबर वार करून चाकूने भोकसून तिच्यावर अचानक हल्ला चढवला असता ती क्षणार्धात रक्ताच्या थारोळ्यात पडली.



मयत महिला

स्थानिकांनी तिला ताबडतोब साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता जखमा गंभीर असल्याने व ज्यादा रक्तस्त्राव झाल्याने तिला वाचवण्यात डॉक्टरांना अपयश आले आहे.या गुन्हाबाबत अधिक माहिती देताना शिर्डी

(उर्वरीत पान ४ वर)



### इझी मनी मुळे हा माज : उपनगराध्यक्ष शेळके

काल झालेल्या खुणाच्या घटनेनंतर शिर्डी नगर परिषद क्शन मोडवर आली असून नगराध्यक्ष सौ जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी पत्रकार परिषद घेत. निंदा करत यापुढे शिर्डीत रस्त्यावरील सर्व धंदे बंद करण्याची घोषणा केली आहे. शिर्डीत झटपट पैसा मिळवून अशा गुन्हेगारी प्रवृत्ती उदयास आली असून इझी मनी मुळे हा काल सारखा दुदैवी प्रकार घडला आहे. घटनेनंतर पालकमंत्री ना. विखे, डॉ. सुजय विखे, डिवायएसपी अमोल भारती, पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, मुख्याधिकारी सतिश दिघे यांची शी सखोल चर्चा करण्यात आली असून अशा प्रकारचे गुन्हेगारी प्रवृती खपवून घेतली जाणार नाही . गुन्हेगारांच्या ज्या टोळ्या तयार झाल्या आहेत त्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. फुटपाथ, रस्त्यावर यापुढे कुणालाही व्यवसाय करता येणार नाही. येथुन पुढे शिर्डीत जे व्यवसाय करायचे त्यानी नगर परिषदची परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा भंगार दुकाने, पानटपऱ्या, फुल दुकान, वेश्या व्यवसाय करणारे लॉज, हातभटटी विकणारे अशा व्यवसायावर बुलडोजर चालवण्यात येईल. ही साईंची नगरी असून क्राईमची नाही येथे कुणाची ही गय केली जाणार नसल्याचा असा खणखणीत इशारा उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी दिला आहे.

### गुन्हेगारीचा बिमोड करण्यास कटीबध्द : ना. विखे

शिर्डी शहरात घडलेली ही घटना अतिशय दुदैवी आहे. घटना घडतेवेळी उपस्थितांनी घेतलेली बघ्यांची भूमिका या मुळे अशा घटनांना पाठबळ मिळते. स्थानिकांनी बाहेर च्या गुन्हेगारी पार्श्वभूमी च्या लोकांना रूम देताना दक्ष रहाणे गरजेचे आहे. स्थानिक नागरीकांनी ज्या भागात गुन्हेगार राहतात त्याची माहीती पुढे येवून दिली पाहिजे. गुन्हेगारीचा बिमोड उच्चाटन झाले पाहिजे पोलीसांना कोंबिंग ऑपरेशन करण्याच्या सुचना दिल्या आहेत. संघटीत गुन्हेगारी वर कारवाई झालीच पाहिजे. जिल्हा गुन्हेगारी चा अड्डा होत चालला हे दुदैव असून जो पर्यंत शंभर टक्के बिमोड होत नाही तोपर्यंत पोलीस कारवाई होतच राहणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे यांनी केले.

# ३१ लाखाचे एमडी ड्रग्स पकडले

## नगरमध्ये तिघांना अटक : दोघे फरार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारी रोखण्यासाठी गस्त घालत असताना, पोलिसांनी अंमली पदार्थांची तस्करी करणारी आणि दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेली एक मोठी टोळी पकडली आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना रंगेहात अटक केली असून, त्यांचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी त्यांच्याकडून १५० ते १६० ग्रॅम एमडी ड्रग्स, विना क्रमांकाची स्विफ्ट मारुती कार व दरोड्यासाठी वापरण्यात येणारी साधने असा सुमारे ३६ लाख ३९ हजार ८७४ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार सतिष साहेबराव त्रिभुवन यांनी याप्रकरणी शासनातर्फे फिर्याद दिली आहे.**

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, १९ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास पोलीस अधिकारी योगेश चाहेर व त्यांचे पथक तारकपूर परिसरातील मिस्कीनमळा येथे गस्त घालत होते. त्यावेळी दर्गा परिसरात एक विना क्रमांकाची पांढऱ्या रंगाची कार संशयास्पद रितीने उभी असलेली दिसली. पोलिसांनी कारजवळ जाऊन चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता, कारमधील दोन जण तातडीने पळून गेले. उर्वरित तिघांनी पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देऊन कार पळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, दक्ष पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पोलीस ठाण्याच्या गेटसमोर पकडले.कारची झडती घेतली असता, पोलिसांना कारमध्ये अत्यंत धक्कादायक वस्तू मिळून आल्या. कारमध्ये एकूण १५०.८७ ग्रॅम वजनाची पांढरी पावडर आणि ४.३५ ग्रॅम वजनाची तपकिरी पावडर सापडली. आरोपींनी ही पावडर 'मॅफेड्रॉन' (एम. डी.) नावाचा घातक अंमली पदार्थ असून ती विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. याशिवाय कारमध्ये रबरी मुखवटे, तीक्ष्ण चाकू, हातमोजे, दोरी, पाने आणि खेळण्यातील बंदूक अशी दरोडा टाकण्यासाठी लागणारी घातक हत्यारे व साधने सापडली. हा सर्व माल जप्त करण्यात आला असून त्याची एकूण किंमत ३६ लाख ३९ हजार ८७४ रुपये आहे.या प्रकरणी पोलिसांनी कारचालक जिशान शौकत सय्यद , रिहान जावेद शेख ( दोघे रा. मुकुंदनगर) आणि वसिम खलिल बागवान ( रा. पिंजार गल्ली) या तिघांना अटक केली आहे. तसेच पळून गेलेला त्यांचा साथीदार जमीर निसार शेख आणि

(उर्वरीत पान ४ वर)

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार

## आरोपी सोनू बेगवर पोक्सो दाखल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीला आमिष दाखवून पळवून नेल्याप्रकरणी आणि तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात पाक्सो कायद्यासह गंभीर कलमांची वाढ करण्यात आली आहे. याप्रकरणी आधीच हत्येच्या गुन्ह्यात अटकेत असलेला आरोपी सोनु उर्फ जयप्रकाश अशोक बेग याला या गुन्ह्यात नव्याने वर्ग करून अटक करण्यात आली आहे.

दि. १५ जुलै २०२६ रोजी फिर्यादी यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, त्यांच्या अल्पवयीन पीडित मुलीस कोणातरी अज्ञात व्यक्तीने आमिष दाखवून व फुस लावून त्यांच्या राहत्या घरातून पळवून नेले आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस तपासात निष्पन्न झाले की, श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्याच गु.र.नं. ६९१/२०२६ (भारतीय हत्यार कायदा कलम ३, ७, २५ सह) या गुन्ह्यात आधीच अटक असलेला आरोपी सोनु उर्फ जयप्रकाश अशोक बेग (वय ४० वर्षे, रा. सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं. ०७, श्रीरामपूर) यानेच वरील अल्पवयीन पीडित मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले होते.



विशेष म्हणजे, ती मुलगी अल्पवयीन असल्याची पूर्ण माहिती असतानाही आरोपीने तिच्याशी बळजबरीने विवाह करून तिच्यावर वारंवार लैंगिक संबंध प्रस्थापित केले आणि तिला गर्भवती केले. तपासात वरील गंभीर बाबी निष्पन्न झाल्यामुळे पोलिसांनी तात्काळ कायदेशीर पावले उचलत या गुन्ह्यात खालील कलमांची वाढ केली आहे.भारतीय न्याय संहिता (बी एन एस) कलम ६४ (ळ), (ज) (I), १४० (४) बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम कलम ४, ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर पोलिसांनी मा. न्यायालयात अहवाल सादर करून, आधीपासून इतर गुन्ह्यात अटकेत असलेल्या आरोपीस श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या गु.र.नं. ६९७/२०२६ या गुन्ह्यात वर्ग करण्याची व औपचारिक अटक करण्याची परवानगी प्राप्त केली असून, त्यास आता या गुन्ह्यात अधिकृतपणे अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

# बीडच्या बनावट ट्रस्टचे पाकिस्तानी कनेक्शन?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माजलगाव :** महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाच्या (एटीएस) तपासात बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील कथित बनावट 'गुलजार-ए-रजा' ट्रस्टसंदर्भात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. तपासादरम्यान या ट्रस्टचे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील 'अल हलिमी' ट्रस्टसोबत आर्थिक

(उर्वरीत पान ४ वर)

# कर्जाचा विळखा : तरुण शेतकरी बेंद्रे यांची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर :** राहाता तालुक्यातील ममदापूर येथील शेतकरी काकासाहेब पुंजा बेंद्रे (वय ४२) यांनी कथित आर्थिक विवंचना व कर्जबाजारीपणाच्या नैराश्यातून राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी उघडकीस आली.



या घटनेने ममदापूरसह परिसरात हळहळ व्यक्त होत असून बेंद्रे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्राथमिक माहितीनुसार, काकासाहेब बेंद्रे हे गेल्या काही काळापासून आर्थिक अडचणी आणि कर्जबाजारीपणामुळे मानसिक तणावाखाली होते. त्यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. या संदर्भात अधिकृत तपास सुरू असून आत्महत्येचे नेमके कारण पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी येथे पाठविला. शवविच्छेदनानंतर अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या प्रकरणाचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्याकडून सुरू आहे. दरम्यान, मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी आणि शासकीय योजनांचा लाभ त्वरीत उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# राज्यात ४ हजार १४३ अंगणवाडी पदांची मेगाभरती सुरु!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महिला व बालविकास विभागामार्फत राज्यभरात अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीस पदांसाठी मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या भरतीअंतर्गत एकूण ४,९४३ रिक्त पदे भरली जाणार असून, पात्र महिला उमेदवारांकडून आजपासून २० जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना २७ ऑगस्ट २०२६ रोजी नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहेत. अंगणवाडी सेविका १,०१५ पदे आणि अंगणवाडी मदतनीस ३,९२८ पदे अशी एकूण ४,९४३ पदांवर भरती केली जाणार आहे. ही भरती विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागातील पात्र महिला उमेदवारांसाठी आहे. सरकारी सेवेत काम करण्याची इच्छा असलेल्या तसेच बालकांच्या पोषण, आरोग्य आणि शिक्षणाशी संबंधित क्षेत्रात समाजसेवेची आवड असलेल्या महिलांसाठी ही सुवर्णसंधी मानली जात आहे.

निवड झालेल्या उमेदवारांना शासनाने निश्चित केलेल्या मानधनानुसार वेतन दिले जाईल. अंगणवाडी सेविकांना १३ हजार रुपये प्रति महिना मदतनीस यांना ७ हजार ५०० प्रति महिना मानधन देण्यात येणार आहे. अर्ज सादर करण्यापूर्वी संबंधित जिल्हा प्रशासन किंवा महिला व बालविकास विभागाने प्रसिद्ध केलेली अधिकृत भरती जाहिरात काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. त्यामध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, आरक्षण, आवश्यक कागदपत्रे आणि इतर अटी तपासूनच अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### भरतीचे वेळापत्रक

महिला व बालविकास विभागाने भरती प्रक्रियेचे वेळापत्रकही जाहीर केले आहे.

ऑनलाइन/अर्ज स्वीकारण्याचा कालावधी : २० जुलै ते ३१ जुलै २०२६, अर्जांची छाननी : ३ ते ७ ऑगस्ट, गुणवत्ता यादीची पडताळणी : १० ते १२ ऑगस्टें हरकती व आक्षेप नोंदविण्याचा कालावधी : १३ ते २६ ऑगस्ट, अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध व नियुक्तीपत्र वितरण : २७ ऑगस्ट २०२६

# विकसित भारताचे स्वप्न आणि राहणीमानाची कठोर परीक्षा

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे ध्येय केंद्र सरकारने निश्चित केले आहे. जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याची आकांक्षा, वेगाने वाढणारा जीडीपी, पायाभूत सुविधांवरील मोठी गुंतवणूक आणि डिजिटल क्रांती या सर्व बाबी निश्चितच आशादायी आहेत. मात्र, एखादा देश केवळ आर्थिक वाढीच्या आकडेवारीवर विकसित ठरत नाही. त्या देशातील नागरिकांचे दैनंदिन जीवन किती सुरक्षित, स्वच्छ, आरोग्यदायी आणि सन्मानजनक आहे, यावरच त्याची खरी प्रगती मोजली जाते. याच वास्तवाची जाणीव इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिटच्या ग्लोबल लिव्हेबिलिटी इंडेक्स २०२६ ने पुन्हा एकदा करून दिली आहे.

या अहवालात डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन सलग दुसऱ्या वर्षी जगातील सर्वाधिक राहणीयोग्य शहर ठरली आहे. पहिल्या दहा शहरांमध्ये व्हिएन्ना, मेलबर्न, सिडनी, झुरिक, जिनिव्हा, ओसाका, ॲडलेड, व्हँकुव्हर आणि टोकियो यांचा समावेश आहे. या शहरांचे वैशिष्ट्य म्हणजे उत्कृष्ट नागरी नियोजन, दर्जेदार सार्वजनिक वाहतूक, सुरक्षितता, पर्यावरणपूरक विकास, सक्षम आरोग्य सेवा, उच्च शिक्षण व्यवस्था आणि नागरिककेंद्रित प्रशासन. दुर्दैवाने भारतातील एकही शहर पहिल्या शंभरमध्ये नाही. दिल्ली १२० व्या, मुंबई १२१ व्या, चेन्नई १२३ व्या आणि बेंगळुरू १२७ व्या स्थानावर आहेत. ही केवळ क्रमवारी नसून भारताच्या नागरी व्यवस्थेवर उमटलेला कठोर शिक्का आहे.

आज भारतात मोठमोठे उड्डाणपूल, द्रुतगती महामार्ग, मेट्रो मार्ग आणि विमानतळ उभे राहत आहेत. पण त्याच शहरांमध्ये पावसाच्या काही तासांत रस्ते जलमय होतात, नाले तुंबतात, वाहतूक ठप्प होते, कचऱ्याचे ढीग साचतात आणि नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. स्मार्ट शहरांची घोषणा झाली; हजारो कोटी रुपये खर्च झाले; परंतु अनेक शहरांमध्ये नागरिकांच्या जीवनमानात अपेक्षित बदल दिसून आलेला नाही. विकासाच्या संकल्पनेत केवळ सिमेंट-कॉंक्रीट नव्हे, तर जीवनाची गुणवत्ता हा केंद्रबिंदू असला पाहिजे.

कोपेनहेगनचे उदाहरण विशेषअभ्यासण्यासारखे आहे. अवघ्या सहा लाख लोकसंख्येच्या या शहरात साडेसहा लाखांहून अधिक सायकली आहेत आणि सुमारे साठ टक्के नागरिक रोज कामावर जाण्यासाठी सायकलचा वापर करतात. यामुळे वाहतूक कोंडी कमी होते, प्रदूषणावर नियंत्रण राहते आणि नागरिकांचे आरोग्यही सुधारते. भारतात मात्र पादचारी आणि सायकलस्वार हे नियोजनाच्या केंद्रस्थानी नसून उपेक्षित घटक ठरले आहेत. फुटपाथ अतिक्रमणांनी व्यापलेले आहेत, सायकल मार्ग अत्यल्प आहेत आणि सार्वजनिक वाहतूक अद्यापही अनेक शहरांत अपुरी आहे.

स्वच्छ भारत अभियानाने स्वच्छतेबाबत जनजागृती केली, हे नाकारता येणार नाही. परंतु प्रत्यक्षात अनेक शहरांमध्ये घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, नाला सफाई आणि प्रदूषण नियंत्रण या क्षेत्रांत गंभीर त्रुटी कायम आहेत. काही शहरांना स्वच्छतेचे पुरस्कार मिळतात, तर दुसरीकडे त्याच शहरांमध्ये कचरा डेपो, दूषित नद्या आणि धुळीने व्यापलेले रस्ते नागरिकांच्या आरोग्यावर घाला घालत आहेत. ही विसंगती दूर करणे अत्यावश्यक आहे.

भारतीयशहरांसमोरील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे अनियंत्रित शहरीकरण. बेकायदेशीर बांधकामे, निकृष्ट दर्जाचे रस्ते, जलनिस्सारण व्यवस्थेचा अभाव आणि भ्रष्टाचारामुळे प्रत्येक पावसाळ्यात महानगरांचे जनजीवन विस्कळीत होते. मुंबईतील पूर, चेन्नईतील जलप्रलय, दिल्लीतील पाणी साचण्याच्या घटना आणि बेंगळुरूतील वाहतूक कोंडी हे अपवाद राहिलेले नाहीत; ते आता व्यवस्थेचे नियमित चित्र बनले आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शहरे अधिक सक्षम करण्याऐवजी आपण संकटांना निमंत्रण देत आहोत.

विकसित राष्ट्र होण्यासाठी भारताने केवळ आर्थिक निर्देशांकांवर नव्हे, तर मानवी विकास निर्देशांक, पर्यावरणीय गुणवत्ता, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, शाश्वत वाहतूक, नागरी नियोजन आणि सुशासन या क्षेत्रांवरही तितक्याच गांभीर्याने भर दिला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक आणि प्रशासकीय स्वायत्तता, उत्तरदायित्व आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. शहरांचा विकास हा निवडणुकीपुरता प्रकल्प न राहता दीर्घकालीन राष्ट्रीय धोरणाचा भाग बनला पाहिजे.

जगातील विकसित देशांनी विकासाची व्याख्या नागरिकांच्या जीवनमानातून सिद्ध केली आहे. भारताकडे तरुण मनुष्यबळ, मोठी अर्थव्यवस्था आणि अमर्याद क्षमता आहे. मात्र, या क्षमतेचे रूपांतर दर्जेदार जीवनात झाले नाही, तर ''विकसित भारत'' ही संकल्पना केवळ भाषणांपुरती मर्यादित राहील. २०४७ चे स्वप्न साकार करायचे असेल, तर प्रत्येक शहर नागरिकांसाठी सुरक्षित, स्वच्छ, हरित आणि राहण्यायोग्य बनविण्याचा निर्धार करावा लागेल.

विकसित भारताचा खरा अर्थ पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था नव्हे; तर असा भारत, जिथे प्रत्येक नागरिक अभिमानाने म्हणू शकेल की, ''हे शहर माझ्यासाठी जगण्यास सर्वोत्तम आहे.''

# शिर्डीतील जनआक्रोश मोर्चा दंगलीतील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

## राहाता कोर्टाचा महत्वपूर्ण निकाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : सन २०१५ साली शिर्डी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गाण्याची रिंगटोन वाजली म्हणून एका सागर शेजवळ नावाच्या दलित तरुणाची हत्या झाली होती. ह्या हत्येच्या निषेधार्थ व आरोपींना अटक करावी अशा विविध मागण्या घेऊन आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी भीमसैनिकांनी शिर्डी येथे संविधानिक मार्गाने जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन त्यावेळी करण्यात आले होते.

या मोर्चा वेळी काही समाजकंटकाकडून शिर्डी शहरात तोडफोड झाली होती या तोडफोडीची संपूर्ण जबाबदारी आयोजकांवर टाकून त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे पोलीस प्रशासनाने दाखल केले होते. या गुन्ह्यांच्या संदर्भात राहाता न्यायालयात जवळजवळ अकरा वर्ष खटला चालला होता.

काल दिनांक २० जुलै २०२६ रोजी या खटल्याचा निकाल लागला व यामध्ये मोर्चाचे आयोजक असलेले भीमसैनिकांची कोर्टाने निर्दोष मुक्तता केलेली आहे. सदर खटला हा ११ वर्ष चालला होता. या खटल्यात आरोपीचे वकील म्हणून शिर्डी नगरपालीकेचे माजी उपनगराध्यक्ष ॲड. अनिल शेजवळ यांनी संपूर्ण आंबेडकरी चळवळीतील भीमसैनिकांची बाजू कोर्टासमोर मांडली होती.

दरम्यान या निकालाबद्दल सर्व आक्रोश मोर्चाच्या आयोजकांच्या वतीने व तमाम आंबेडकरी जनतेच्या वतीने व न्यायाधीश राहाता कोर्ट व ॲड. अनिल शेजवळ यांचे आभार व्यक्त केले आहे.




# प्रवरा गर्ल्स इंग्लिश स्कूलमध्ये 'कर्टन कॉल' आंतरशालेय इंग्लिश नाट्य स्पर्धा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी,** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, लोणी यांच्या वतीने आयोजित 'कर्टन कॉल' आंतरशालेय इंग्लिश स्किट स्पर्धा २०२६-२७ मोठ्या उत्साहात पार पडली. गंगूबाई स्टेडियम, लोणी येथे झालेल्या या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सामाजिक आशय असलेल्या इंग्रजी नाटिका प्रभावीपणे सादर करत अभिनय, सर्जनशीलता आणि सांघिक कौशल्याचे दर्शन घडविले. स्पर्धेत प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूल, प्रवरानगर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. प्रवरा हायस्कूल, कोल्हार यांनी द्वितीय, तर प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, लोणी यांनी तृतीय क्रमांक मिळविला.वैयक्तिक गटात सैनिक स्कूलच्या प्रेम कदम याला उत्कृष्ट नायक, तर प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या आर्या भालेकर हिला उत्कृष्ट नायिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्पर्धेतील सर्व नाटिकांचे परीक्षण प्रा. श्रीकांत सुसर आणि डॉ. रोहिणी कासार यांनी केले. रंगमंचावरील आकर्षक सजावट, प्रभावी वेशभूषा आणि विद्यार्थ्यांचा दमदार अभिनय यामुळे संपूर्ण वातावरण नाट्यमय झाले होते. कार्यक्रमाचे नियोजन इंग्रजी विभागाच्या राजश्री खर्डे, जालिंदर गाडे आणि बाळासाहेब गायकर यांनी केले. हर्षदा नेहे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या संघांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.



# जिद्द, चिकाटी आणि सातत्यानेच यश मिळते : डॉ. विक्रांत ढमक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा हायस्कूल, कोल्हारने स्थापनेच्या ५० व्या वर्षात दिमाखदार पदार्पण करत सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रारंभ उत्साहात केला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात शाळेचे माजी विद्यार्थी तथा आयआयटी मद्रासचे प्राध्यापक डॉ. विक्रांत ढमक यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना डॉ. ढमक म्हणाले, ''अपयशाने खचून न जाता जिद्द, चिकाटी आणि सातत्य अंगीकारल्यास कोणतेही यश प्राप्त करता येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे योगदान मोलाचे आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन आज जागतिक स्तरावर कार्य करण्याची संधी मला मिळाली, याचे श्रेय प्रवरेच्या शिक्षणसंस्कारांना जाते.''



प्राचार्य सुधीर मोरे यांनी प्रास्ताविकातून विद्यालयाच्या ५० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, १९ जुलै १९७६ रोजी अवघ्या २२ विद्यार्थी आणि दोन शिक्षकांसह सुरू झालेल्या या विद्यालयाने आज गुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. गेल्या १९ वर्षांपासून शाळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून परिसरातील १८ गावांतील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत.

डॉ. ढमक यांनी सीबीएसई अभ्यासक्रम, तसेच प्रवरा फाउंडेशन अकॅडमीच्या माध्यमातून नीट, जेईई आणि सीईटीसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधींचे महत्त्वही अधोरेखित केले.

यावेळी संभाजीराजे देवकर, अशोक शेठ आसावा, पत्रकार संजय कोळसे, सौंदर्य खर्डे, ओम शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास आबासाहेब राऊत, सुनील शिंदे, गोरख खर्डे, मधुकर खर्डे, प्रकाश पारखे, इलियाजभाई शेख, पत्रकार प्रमोद कुंभकर्ण, गणेश सूर्यवंशी आदी उपस्थित होते. अनुलेखा नवले व सेजल शेळके यांनी सूत्रसंचालन, तर साईशा तुपे हिने आभार मानले. स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य संभाजीराव देवकर यांनी विद्यालयाला ५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प विद्यालयाने व्यक्त केला.

# पाणीपट्टीची थकबाकी भरण्यास टाळाटाळ, पाणी वितरण युनिटला टाळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी येथील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या प्रथमेश एंटरप्राईजेसला पाणीपट्टीची थकबाकी भरण्याबाबत वारंवार सूचना करूनही दुर्लक्ष करणाऱ्या प्रथमेश एंटरप्रायजेसची दोन वाहने जप्त करून पाण्याच्या टाकीजवळील असलेल्या पाणी वितरण युनिटला राहुरी नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख सुनील कुमावत यांनी टाळे ठोकले आहे.

मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. जलतृप्ती योजना या नावाखाली राहुरी नगर परिषद व प्रथमेश एंटरप्रायजेस यांच्या संयुक्त विद्यमाने २०२२ मध्ये राहुरी शहरात हा उपक्रम सुरू केला होता. शुद्ध पाणी पुरवठ्याचा हा ठेका नाशिक येथील प्रथमेश एंटरप्रायजेस यांना देण्यात आला होता. एटीएम मशिनद्वरे ठेकेदाराकडून पाण्याची विक्री व्यवस्था करण्यात आली होती.

सुरवातीचा काहीकाळ थोड्या प्रमाणात पानिपति भरली परंतु त्यानंतर संबंधित ठेकेदाराने नगर परिषदेची पाणीपट्टी भरण्यास चालढकल केल्याने २०२६ पर्यंत पाणीपट्टी थकबाकीचा आकडा ७ लाख रूपयांच्या पुढे गेला. थकबाकीची रक्कम भरण्याबाबत संबंधितास वारंवार सूचना तसेच बिले बजावण्यात आली. मात्र, प्रथमेश एंटरप्रायजेस् चालकाने या सूचनांची कुठलीही दखल घेतली नाही.



अखेर पाणी पुरवठा विभागप्रमुख सुनील कुमावत यांनी संबंधित ठेकेदाराची पाणी वितरण करणारी दोन वाहने जप्त करून पाणी वितरण करणारे एटीएमडब्ल्यू युनिटला टाळे ठोकल्या मुळे प्रथमेश एंटरप्राइजस चे धाबे दणाणले आहे.

# अवैध विदेशी दारूचा साठा जप्त ; पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : धोंदलगाव शिवारातील पत्र्याच्या शेडमध्ये विक्रीच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेला ७२ हजार रुपयांचा विदेशी दारूचा साठा वैजापूर पोलिसांनी सोमवारी (२० जुलै) सायंकाळी छापा टाकून जप्त केला. या प्रकरणी पिता-पुत्राविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवैध धंद्याविरोधात कारवाईसाठी पोलीस उपनिरीक्षक नितीन नलवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक परिसरात गस्त घालत होते. यावेळी गोपनीय माहितीदारामार्फत धोंदलगाव ते राहेगाव मार्गावरील वाघ वस्ती येथील पत्र्याच्या शेडमध्ये विदेशी दारूचा अवैध साठा असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पंचांना सोबत घेऊन सायंकाळी सुमारे ६.१५ वाजता छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान शेडमध्ये सोपान कारभारी वाघ (वय ६४) हे उपस्थित आढळून आले. शेडची तपासणी केली असता रॉयल स्टॅग कंपनीच्या विदेशी दारूचे सहा बॉक्स आढळून आले. चौकशीत हा साठा त्यांचा मुलगा बाबासाहेब सोपान वाघ (वय ४०) याने आणून ठेवल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी सहा बॉक्समधील १८० मिली क्षमतेच्या एकूण २८८ सिलबंद बाटल्या, अंदाजे ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. त्यातील एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी राखून ठेवण्यात आली असून उर्वरित मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार सचिन रखपारखे यांच्या फिर्यादीवरून सोपान कारभारी वाघ व बाबासाहेब सोपान वाघ, दोघेही रा. वाघ वस्ती, धोंदलगाव शिवार, ता. वैजापूर यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ५५(ई) अन्वये वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविणार : डॉ.अमित पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महाराष्ट्र शासनाने महसूल विभाग अधिक गतिमान व लोकाभिमुख व पारदर्शक करण्याकरता अनेक निर्णय घेतले आहे. या निर्णयाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी शासनाचे विविध प्रकारे प्रयत्न चालू आहे त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस आणि माजी मुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यामध्ये दिनांक २२ जुलै २५ जुलै व २६ जुलै २०२६ या तीन दिवसांपैकी एका दिवशी प्रत्येक विधानसभा मतदारसंघ निहाय अभियान राबविणे संदर्भात महाराष्ट्र शासनाने आदेश दिलेले आहे त्यानुसार राहुरी तालुक्यात महाराजस्व समाधान शिबिर अभियान दिनांक २२ जुलै रोजी राहुरी येथील स्नेहपुज मंगल कार्यालयात सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आले आहे.



सदर शिबिरामध्ये राज्यातील महिलांना शेतकरी दर्जा देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. गावठाणातील नागरिकांना स्वामीत्व देण्याची सनद वाटप करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पानंद रस्ते योजना, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण नियमित करणे, तुकडेबंदी कायद्याविरुद्ध झालेले खरेदी विक्रीचे व्यवहार व हस्तांतरण बाबत गाव निहाय यादी व कार्यवाही करणे, जिवंत सातबारा मोहीम राबविणे, राज्यातील सिंधी विस्थापितांच्या निवासी व वाणिज्य जमिनी फ्री होल्ड करण्यासाठी विशेष अभय योजना २०२५ ला एक वर्ष मुदतवाढ देणे राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष तरतूद, कुंभार समाजातील व्यक्तींना पारंपारिक व्यवसायासाठी सवलती, शेतजमिनीच्या कौटुंबिक वाटणी पत्रावरील नोंदणी फी पूर्णपणे माफ, सामाजिक अर्थसाह्य योजना, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ई मोजणी ॲग्री स्टॅग पी एम किसान याच्यासह विविध विभागाच्या लाभांच्या योजनांच्या तक्रारी निवारण करण्यात येणार आहेत.

सदरच्या शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन अर्ज स्वीकृती तक्रारीचे निवारण तसेच प्रलंबित प्रकरणावर तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे तरी राहुरी तालुक्यातील सर्व नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत समाविष्ट बाबींचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्राम महसूल अधिकारी मंडळ अधिकारी तहसील कार्यालय राहुरी कुळ कायदा शाखा येथे संपर्क साधावा असे आवाहन राहुरीचे तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी केले आहे.

# वारकऱ्यांइतकेच पुण्याचं धनी!

## सलग ३२ वर्षांपासून अखंड अन्नदानाची सेवा

**भाऊसाहेब काळे | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : पंढरपूरच्या आषाढी पायी पालखी सोहळ्यात वर्षानुवर्षे चालत जाणाऱ्या वारकऱ्यांच्या पदरात जेवढे पुण्य पडते, तेवढेच पुण्य या वारकऱ्यांची सेवा करणाऱ्या अन्नदानदात्यांच्या पदरातही पडते. असा मन हेलावून टाकणारा आणि अनुभूती देणारा अनुभव सेवानिवृत्त प्राध्यापक रंगनाथ कोळसे यांनी व्यक्त केला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील संत तुळशीराम महाराज पायी पालखी सोहळ्यानिमित्त रूईछत्तीशी (जि. अहिल्यानगर) येथे मुक्कामात असताना, सलग ३२ वर्षांपासून अन्नदान पंक्तीची सेवा अविरतपणे सुरू ठेवणाऱ्या प्रा. कोळसे परिवाराने पत्रकारांशी विशेष बातचीत केली.



श्रीक्षेत्र पंढरपूरच्या आषाढी वारीत विठ्ठलदर्शनासाठी जाणारे वारकरी आपले जीवन धन्य मानतात. वयोवृद्ध वारकऱ्यांच्यानंतर त्यांचे पुढील वारसदार हा परंपरांचा वारी वारसा अखंडितपणे पुढे चालवतात. अगदी अशीच भक्तिभाव आणि सेवेची परंपरा वारी मार्गावर चहा, नाश्ता आणि अन्नदान करणाऱ्या कुटुंबांमध्येही पाहायला मिळते, असे प्रा. रंगनाथ कोळसे यांनी आवर्जून सांगितले.

आपला ३२ वर्षांचा प्रवास उलगडताना प्रा. कोळसे म्हणाले की, ते अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या रूईछत्तीशी येथील उच्च माध्यमिक विद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. १९९३-९४ च्या सुमारास गावातील ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या सहकार्याने 'संत तुळशीराम महाराज देवस्थान'तर्फे पंढरपूर पायी पालखी सोहळा सुरू करण्यात आला.

स्वतः नोकरी करत असलेल्या गावातच आपल्या गावातील दिंडी सोहळा मुक्कामास येत असल्याचा मनस्वी आनंद प्रा. कोळसे यांना झाला. त्यांनी ज्या विद्यालयात अध्यापन केले, त्याच विद्यालय प्रांगणात दिंडीच्या मुक्कामाची सोय केली आणि याच मुक्कामात पहिली अन्नदान पंक्ती त्यांच्या परिवाराने आनंदाने स्विकारली.

त्याकाळी उच्च माध्यमिक विद्यालयात विनाअनुदानित तत्त्वावर अल्प पगारावर नोकरी करत असतानाही, त्यांनी संत तुळशीराम महाराज दिंडीसाठी दरवर्षी अन्नदान पंक्तीची सेवा मनोभावे सुरूच ठेवली. या सेवेचे फळ म्हणून अवघ्या तीन वर्षांतच त्यांचे विद्यालय अनुदानित आले आणि पगारात वाढ झाली.

यादरम्यान त्यांची बदली टाकळी ढोकेश्वर आणि नंतर देवळाली प्रवरा येथे झाली, परंतु रूईछत्तीशी येथील दिंडी सोहळ्याची अन्नदान पंक्ती सेवा त्यांनी कधीही खंडित केली नाही. पंढरीच्या पांडुरंगाच्या आशीर्वादाने आणि संत तुळशीराम महाराजांच्या कृपेने आपल्या पदरात भरभरून पुण्य आणि प्रगती पडल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

आज सेवानिवृत्तीनंतरही प्रा. कोळसे सहकुटुंब आणि संपूर्ण मित्रपरिवारासह दरवर्षी रूईछत्तीशी येथे जाऊन मोठ्या उत्साहाने वारकऱ्यांना अन्नदान सेवा देत आहेत. सुरुवातीच्या पहिल्या ५ वर्षांच्या तुलनेत आज दिंडीतील वारकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे, आणि जशी वारकऱ्यांची संख्या वाढली, तशीच या परिवाराचीही आध्यात्मिक व व्यावहारिक प्रगती होत गेली.

पायी दिंडी सोहळ्यात वर्षानुवर्षे सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांप्रमाणेच अन्नदान, चहा आणि नाश्ता देणाऱ्या भक्तांना या सेवेचे खरे फलित काय असते, हे केवळ तो सेवा करणारा परिवारच अनुभवू शकतो. याच कारणामुळे पालखी मार्गावरील गावांमध्ये आधीपासून अन्नदान पंक्ती स्वीकारणारी परंपरागत कुटुंबे आपली सेवा सहसा सोडत नाहीत, आणि नवीन इच्छुकांना या पवित्र सेवेची संधी मिळणे हेदेखील भाग्याचे मानले जाते, असा सुंदर अनुभव सांगत प्रा. कोळसे यांनी ही सेवा भविष्यातही अशीच सुरू ठेवण्याचा आपला ठाम संकल्प व्यक्त केला.

# शनीशिंगणापुरात वाहन अडवून पूजा साहित्य विक्री; दोघांवर गुन्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे देवस्थान परिसरात रस्त्यावर भाविकांचे वाहन अडवून भाविकांना पूजा साहित्य विक्रीसाठी अडथळा निर्माण करणाऱ्या दोघांविरुद्ध शनिशिंगणापूर पोलिसांनी स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या घटनेत तुषार लक्ष्मण वैरागर (वय २५, रा. शिंगणापूर, ता. नेवासा) याच्याविरुद्ध सोमवारी (दि. २०) सकाळी सुमारे १०.१० वाजता देवस्थान पार्किंगसमोरील रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करून भाविकांना पूजा साहित्य विक्री केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १२६(२) व २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत विकास चांगदेव गायकवाड (वय २०, रा. पानसनाला, घोडेगाव, ता. नेवासा) याच्याविरुद्ध सोमवारी दि.२० रोजी दुपारी सुमारे ३.२० वाजता अशाच प्रकारे रस्त्यावर भाविकांचे वाहन अडवून अडथळा निर्माण करून पूजा साहित्य विक्री केल्याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला.दोन्ही प्रकरणांमध्ये पोलीस कर्मचारी रविकांत बाबासाहेब गर्जे यांनी फिर्याद दिली असून शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणांचा पुढील तपास शनीशिंगणापूर पोलीस ठाण्याचे सपोनि दिपक धनवटे यांच्या मार्गदर्शना खाली पोसई कारखेले हे करित आहेत.

**शनीशिंगणापूर पोलीस ठाण्यात नवीन बदलून आलेले सहायक पोलीस निरीक्षक दिपक धनवटे यांनी शनी मंदिर व परिसरात लटकू मोहीम तीव्र केली आहे.त्यांनी मंदिर परिसरात व रस्त्यावर २४तास चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला असून अतिशय कर्तव्यदक्ष व धाडसी असलेले धनवटे यांनी लटकू मोहीम पहिल्या पेक्षा अधिक कडक केली आहे.त्यामुळे बदलून आल्या पासून त्यांनी अनेक कारवायाचा धडाकाच लावला आहे.**

# नेवासा सायकल क्लबच्या पंढरपूर सायकल रॅलीचे ठीकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** नेवासा सायकल क्लबच्या वतीने दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी आयोजित नेवासा ते पंढरपूर या २५० किलोमीटर अंतराच्या सायकल प्रवास होतो. १८ ता.शनिवारी सकाळी नेवासा फाटा राजमुद्रा चौक येथून पहाटे ५:३० ला सायकल वारी ला सुरवात झाली. नेवासा फाटा,घोडेगाव.पांढरीपुल शेंडी,अहिल्यानगर, करमाळा जेऊर, टेंभुर्णी मार्गेपंढरपूर ला पोहचली. नेवासा सायकल क्लबचे गणेश माटे,प्रशांत बडाख, अल्ताफ शेख,शिंदे सर,चंद्रकांत सेवक,शिवा मोटे,दिलीप गिरी,प्रशांत तनपुरे,सुनिल सुळ,गिरी मॅडम,बाळासाहेब हापसे,आदित्य सेवक,मनोज पठाडे,गणेश केळगंद्रे, कैलास गायकवाड हे सदस्य या पंढरपूर सायकल रॅलीत सहभागी झाले होते सायकलिंस्ट पहिल्या टप्प्यात १९०कि.मी. तर दुसऱ्या दिवशी ६० कि.मी. पावसाच्या छान वातावरणाचा आनंद घेत पंढरपूर सायकल वारी २५० कि.मी.यशस्वी पुर्ण केली.या रॅलीतील सदस्यांनी भाविकांनी स्वागत करत अभिनंदन केले

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### रस्ता अडवून महिला शेतकऱ्यास मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**सोनई :** नेवासा तालुक्यातील पांढरीपूल - वांजोळी येथे रस्त्याच्या कारणावरून एका ३० वर्षीय महिला शेतकऱ्यास शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी (दि. १९) दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास आरोपींच्या घरासमोर घडली. फिर्यादी महिला शेतात जात असताना आरोपींनी तिचा रस्ता अडवून, तुला सांगितलेले कळत नाही का, या रस्त्याने जायचे नाही, असे म्हणत शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.तसेच एका आरोपीने फिर्यादीचे केस पकडून हाताने व लाथाबुक्काने मारहाण केली, तर दुसऱ्या आरोपीने फिर्यादीला लज्जा उत्पन्न होईल असे गैरवर्तन केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस ) मधील संबंधित कलमांनुसार चौघा जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सोनई पोलीस ठाण्याचे स.पो.नि. अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल दत्ता गावडे करीत आहेत.

### नीट परीक्षेतील यशाबद्दल श्रद्धा देशमानेचा सत्कार

**पुणतांबा :** येथील अमृतेश्वर महादेव मंडळाच्या वतीने नीट परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविल्याबद्दल श्रद्धा गणेश देशमाने हिचा सत्कार करण्यात आला. नीट परीक्षेत यश संपादन करून श्रद्धाने पुणतांबा परिसराचे नाव उज्ज्वल केले. यापूर्वी दहावी व बारावी परीक्षेतही तिने पुणतांबा केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला होता. जिद्द, कठोर परिश्रम तसेच आई-वडील आणि मामांकडून मिळालेल्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे हे यश मिळाल्याची भावना श्रद्धाने व्यक्त केली. यावेळी निलेश दुर्गुडे, प्रकाश देशमाने, दीपक काळे, पत्रकार श्रीरंग गोऱ्हे, प्रवीण विसपुते, मनोज देशमाने, साई जंगाले, सार्थक गोऱ्हे तसेच महिला मंडळाच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### दुबैय्या हत्याप्रकरण; कठोर कारवाईची आदिक यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**श्रीरामपूर :** आकाश दुबैय्या हत्याप्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई करून पीडित कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा सचिव अविनाश आदिक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट संदेशाद्वारे केली आहे. आदिक यांनी पाठविलेल्या संदेशाची मुख्यमंत्र्यांनी तात्काळ दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात शासन गंभीर असून पीडित कुटुंबाला न्याय मिळावा आणि श्रीरामपूरकरांच्या मनातील भीतीचे वातावरण दूर व्हावे, यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असा विश्वास आदिक यांनी व्यक्त केला. आकाश दुबैय्या यांच्या हत्येनंतर श्रीरामपूर शहरात संतापाची लाट उसळली असून दोषींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी विविध सामाजिक व राजकीय स्तरांतून होत आहे.

### श्रीरामपूरच्या पवित्रा चोथाणी हिचे नीट परीक्षेत यश!

**श्रीरामपूर :** पवित्रा तुषार चोथाणी हिने नीट २०२६ परिक्षेत ६२५



गुण आणि देशपातळीवर ४१६३ रँक मिळवत ऐतिहासिक यश संपादन केले आहे. या यशाने श्रीरामपूर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिची मोठी बहीण हार्दिका हिनेही एमबीबीएसमध्ये दोन सुवर्णपदके मिळवली असून, पवित्राने तिच्याच पावलावर पाऊल ठेवले आहे. दहावीत तालुक्यात प्रथम आलेल्या पवित्राने जेईईमध्येही ९४ पर्सेंटाइल मिळवले होते. ती उद्योजक तुषार चोथाणी यांची कन्या व व्यापारी गोवर्धन चोथाणी यांची नात आहेत. तिच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### महामार्गाचे मनमानी काम अन् घरात पाणी शिरून लाखोंचे नुकसान

**चिचोंडी पाटील :** नगर -जामखेड महामार्गाचे काम करताना कही खुशी कही गम सारखी परिस्थिति झाली असुन सारोळा बुद्धी ग्रामपंचायत हद्दीतील कोल्हेवाडी फाटा येथील किरण गुंजाळ व शंकर गुंजाळ यांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याने लाखोंचे नुकसान झाले असुन नगर जामखेड महामार्गाचे काम सुरु असताना कोल्हेवाडी फाटा येथे चारीचे काम व्यवस्थित रित्या पूर्ण न झाल्याने सदर रस्त्यावरील पाणी घरात व दुकानात शिरल्याचा आरोप शंकर गुंजाळ यांनी केला. काम सुरु असताना योग्य उपाययोजना करण्यात आल्या नसल्याने गुंजाळ यांच्या दुकान वर घरामध्ये पाणी शिरून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे त्याचबरोबर घर उपयोगी वस्तूंचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून याबाबत नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रशासन दरबारी मागणी होत आहे.

## सोनम वांगचूक यांच्या समर्थनार्थ
# नेवाशात गुरु-शिष्य आक्रोश मोर्चा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** दिल्ली येथे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी उपोषणास बसलेले सोनम वांगचुक यांच्या समर्थनासाठी तसेच विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी यांच्या विविध मागण्याबाबत गुरु शिष्य आक्रोश मोर्चा काढत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलकांनी भारत माता की जय,वंदे मातरमव सरकार विरोधी च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

नीट पेपर लीक प्रकरणाची सखल चौकशी करावी तसेच पेपर लीक प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, टीईटी पेपर लीक प्रकरणाची चौकशी करून राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, महाराष्ट्र पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवण्यात यावी, सर्व शासकीय भरती परीक्षा पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने घेऊन भविष्यात पेपर फुटणार नाही यासाठी कठोर कायदे करण्यात



यावे अशा विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक नेवासा यांना देण्यात आले.विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असे ही आंदोलनकर्त्यांनी यावेळेस सांगितले.

यावेळी आंदोलनासाठी विद्यार्थी संघटनेचे आकाश धनवटे, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस रंजनदादा जाधव, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजू आघाव, राष्ट्रवादीचे विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शुभम बंब, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष संभाजी माळवदे यांची यावेळी भाषणे झाली

यावेळी सोनई तंटामुक्ती संघटनेचे अध्यक्ष गणेश गडाख, नेवासा व्यापारी संघटनेचे कुणाल मांडण, भारत कोकणे, गणेश सोनवणे, काँग्रेसचे अंजुम पटेल, संदीप कुसळकर, अँड.जैद शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र पोद्दार, राहुल सूर्यवंशी, इरफान शेख, अरुण जाधव,मोहनराव भवाळ, विविध विद्यार्थी संघटनांचे अनिकेत अंबाडे, अतिश धनवटे, सोमेश्वर नवगिरे, कैलास मस्के ,सचिन जाधव, इंजिनीयर अमोल मिसाळ, समाधान जाधव, सिद्धांत कांबळे, अमन सय्यद, ऋषिकेश जंगम, मच्छिंद्र जाधव, अश्फाक शेख, सुयश बेलेकर, इमरान शेख, निखिल विरकर, अजिंक्य आठरे, दीपक वाघ यांच्या समवेत शेकडो विद्यार्थी शिक्षक व नागरिक उपस्थित होते.

## आकाश दुबैय्या यांची हत्या वेदनादायी : थोरात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील युवा उद्योजक आकाश दुबैय्या यांची झालेली निर्घृण हत्या अत्यंत वेदनादायी आणि संतापजनक आहे, अशा शब्दांत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला आहे.

रविवार, १९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी श्रीरामपूर येथील दुबैय्या यांच्या निवासस्थानी भेट दिली. या वेळी त्यांनी स्वर्गीय आकाश दुबैय्या यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण



श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी दुबैय्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि या कठीण प्रसंगी आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले.

या घटनेमुळे संपूर्ण शहरात शोककळा पसरली असून, दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. माजी मंत्री थोरात यांनी या दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त करतानाच, पीडित कुटुंबाला धीर देण्याचा प्रयत्न केला.

## बालकांना रणरागिणी मंडळाकडून साहित्य वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** शिर्डी मतदारसंघातील लोणीसह परिसरातील रणरागिणी महिला मंडळाच्या सदस्यांसाठी मंडळाच्या अध्यक्षा धनश्रीताई विखे यांच्या पुढाकाराने गंगाधर बाबा छात्रालय येथील बालगृहाला भेट देण्याचा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. या भेटीदरम्यान महिला सदस्यांनी बालगृहातील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांना प्रेम, आपुलकी आणि प्रोत्साहन दिले. महिलांच्या सहवासामुळे मुलांच्या चेहऱ्यावर फुललेले आनंदाचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना सदस्यांनी व्यक्त केली.

यावेळी धनश्रीताई विखे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जेवण, शालेय गणवेश, पेन्सिल बॉक्स व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या



उपक्रमामुळे बालकांच्या आयुष्यात आनंदाचे आणि प्रेरणेचे क्षण निर्माण झाल्याचे सामाजिक कार्यकर्त्या व रणरागिणी महिला मंडळाच्या सदस्या शोभनाताई सोनवणे यांनी सांगितले. तसेच धनश्रीताई विखे यांच्या सामाजिक बांधिलकीमुळे गरजू बालकांना मायेचा आधार मिळत असून अशा उपक्रमांमधून समाजाप्रती संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. माणुसकीची खरी ओळख म्हणजे गरजूंना दिलेला प्रेमाचा आणि आपुलकीचा आधार, हा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या मनात कायमस्वरूपी ठसा उमटवून गेला.

## पेन्शनवाढीची मागणी पूर्ण होईपर्यंत लढा सुरूच : पोखरकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** विविध संस्था, महामंडळे व कारखान्यांमधील ईपीएस-९५ योजनेतील निवृत्त पेन्शनधारकांना दरमहा ७,५०० रुपये किमान पेन्शन व त्यासोबत महागाई भत्ता देण्याची मागणी पूर्ण होईपर्यंत राष्ट्रीय संघर्ष समितीच्या माध्यमातून संघटित लढा सुरू ठेवला जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय संघर्ष समितीचे सुभाष पोखरकर यांनी केले. तसेच या लढ्याला अधिक बळ मिळण्यासाठी सर्व संबंधित पेन्शनधारकांनी संघटित होण्याचे आवाहनही त्यांनी केले. जिल्हा सहकारी बँकेच्या डॉ. बाबुरावदादा तनपुरे सभागृहात जिल्हा बँकेचे




निवृत्त अधिकारी अण्णासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पोखरकर यांनी राष्ट्रीय संघर्ष समितीची भूमिका स्पष्ट करत मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, देशातील विविध संस्था, महामंडळे आणि कारखान्यांतील सुमारे ८० लाख ईपीएस-९५ पेन्शनधारक गेल्या दहा वर्षांपासून कॅप्टन अशोकराव राऊत यांच्या नेतृत्वाखाली किमान ७,५०० रुपये मासिक पेन्शन व महागाई भत्त्याच्या मागणीसाठी संघर्ष करत आहेत. ही मागणी मान्य होईपर्यंत संघटितपणे लढा सुरू ठेवावा लागेल, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात अण्णासाहेब म्हस्के यांनी न्याय्य मागण्यांसाठी संघटित आंदोलनाबरोबरच आवश्यक असल्यास न्यायालयीन लढाही दिला जाईल, असे सांगत संघटनेला सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी विनायक लोळगे, सुलेमानभाई, भोपे, जगधने, तनपुरे, नानासाहेब शेळके, अविनाश सालके, गोकुळ चिंतामणी, जिल्हाध्यक्ष संपत समिंदर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार ईघे यांनी मानले.

## वाकडी-श्रीरामपूर रस्त्याच्या प्रलंबित कामाला सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी :** पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेला शब्द पाळत वाकडी-श्रीरामपूर रस्त्यावरील प्रलंबित व नादुरुस्त रस्त्याच्या कामाला अखेर जलदगतीने सुरुवात केली आहे. यामुळे वाकडी आणि धनगरवाडी परिसरातील ग्रामस्थांनी मोठा दिलासा व्यक्त करत पालकमंत्र्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. राहाता तालुक्यातील येथील वाकडी-श्रीरामपूर रस्त्यावरील यशवंतबाबा चौकाजवळ एमआयडीसी परिसरात जवळपास ७०० मीटरचा रस्ता गेल्या कित्येक महिन्यांपासून अत्यंत खराब व नादुरुस्त झाला होता. या खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे नागरिकांना आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. स्थानिक नागरिकांकडून या रस्त्यासाठी वेळोवेळी निवेदने देण्यात आली आणि आंदोलनेही झाली, परंतु वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींकडून याकडे दुर्लक्ष होत होते.काही दिवसांपूर्वी धनगरवाडी-दिघी पंचक्रोशीत होऊ घातलेल्या सद्गुरू गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह स्थळाची पाहणी करण्यासाठी आणि येथील अडीअडचणींचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील याच मार्गावरून जात होते.



## हरवले आहे

माझे द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष कॉम्पुटर इंजिनीरिंग चे ओरिजिनल मार्कशीट हे बेलवंडी ते उक्कडगाव प्रवासादरम्यान दिनांक १८/०७/२०२६ रोजी हरवले आहे.

सदर कागदपत्रे कोणास मिळाल्यास कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा.तसेच या कागदपत्राचा कोणी गैरवापर केल्यास मी जबाबदार राहणार नाही.

**रमेश शिवाजी आरकस**
**रा. बेलवंडी बु, ता. श्रीगोंदा,**
**जि. अहिल्यानगर.**
**संपर्क- ७३८७५८३२३०**

## जाहीर प्रकटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
मी जन्म-मृत्यु एसआर २७/२०२५
नेवासा दिनांक १०/७/२०२६

अर्जदार श्री श्रीम. युसुफ सांडुखॉ पठाण रा.जळके खर्द ता. नेवासा यानी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. साइखाँ राजेखॉ पठाण महाराष्ट्र जन्म मत्य नोंदणी कायदा १९६९ वे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ. क्र. | जन्म-मृत्यु नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | मृत्यु दिनांक |
|---|---|---|---|
| १. | कै. सांडुखा राजेखा पठाण | जळके खुर्द | ०१/११/२०१३ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सूचित करण्यात येते की वरील व्यक्तीच महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

शिक्का
सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**



## शिर्डीत १२ चारी संघर्ष पुन्हा पेटणार; चिन्हे, दोन्ही गटांकडून सह्यांची मोहीम

**अशोक दुशिंग**
**राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिर्डी शहरात गाजत असलेल्या १२ चारीच्या भूमिगत करण्याच्या मुद्यावरून वाद थांबण्याची चिन्हे दिसत नसून नुकतेच डॉ सुजय विखे यांनी पश्चिमेचा वाद मिटवल्यानंतर आता नव्याने पुर्वेचा वाद उपस्थित होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे. सत्ताधारी नगरसेवकांनी विकासकाम होण्यासाठी सह्याची मोहीम राबवली असून त्याला विरोध करण्यासाठी स्थानिकांनी विरोधी भूमिका राबवल्याने या चारी वरून पुन्हा संघर्ष उभा राहण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

गेल्या महिन्यापासून १२ चारी विकसीत करण्या बाबत मोठा संघर्ष उभा राहीला होता. हा प्रश्न पश्चिमे कडील असल्याने तो प्रश्न डॉ. सुजय विखे यांनी शांत केला असतानाच आता सदर चारी पुर्वेकडे जात असून तेथील नागरिकांनी ती चारी बंदीस्त करू नये अशी भूमिका घेतली आहे. तर विदयमान नगरसेवकांनी निधी परत जावू नये म्हणून काम होण्याच्या बाजूने लाभधारकांच्या सहयांचे अभियान राबवले आहे.

**हो काम झालेच पाहिजे : वसंत गोंदकर**

आम्ही वार्डातील विकासासाठी कटीबद्ध असून चारी बंदीस्त होवून रस्ता झाल्यास मोठा निधीचा विनियोग होणार आहे. ही भूमिका नागरिकांनी समजून घेणे गरजेचे आहे. विरोधासाठी विरोध योग्य नाही आम्ही त्या साठी सह्यांचे अभियान राबले असून काम होणारच या दिशेने आमची वाटचाल आहे.

**चारी फक्त दत्तनगर पर्यत : नंदू गोंदकर**

आमचे वार्डातील चारीवर तो निधी वळवण्याचा काही प्रश्न नसून पुर्वेकडील चारीचे टेंडर प्रक्रिया नाही आम्ही कोणत्याही प्रकारचे सह्यांच अभियान राबवले नाही.



## जाहिर नोटीस

**भोकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भोकर. ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर**

जा.क्र. दि. २०.०७.२०२६

भोकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भोकर, ता. श्रीरामपूर या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील अनुसुचित जाती/जमाती या मतदारसंघातील श्री. अमोलिक याकोब यमाजी हे या मतदार संघातून निवडून आले होते. श्री. अमोलिक याकोब यमाजी हे मयत झाल्यामुळे अनुसूचित जाती/जमाती या मतदारसंघातील पद दिनांक २६/०६/२०२६ रोजी रिक्त झाले आहे. सदर अनुसुचित जाती/जमाती या प्रवर्गातील नैमित्तिक रिक्त झालेल्या एक (१) संचालकांच्या निवडीकरिता मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचेकडिल दि. ०७/०७/२०२६ रोजीच्या आदेशानुसार प्राधिकृत अध्यासी अधिकारी म्हणून श्री. रविंद्र जाधव, सहायक सहकार अधिकारी, अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता संस्थेचे कार्यालय, भोकर तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संचालकांना संचालक मंडळ सभेस हजर राहणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

विषय क्र. १- **अनुसुचित जाती / जमाती या मतदारसंघातील एक (०१) जागेसाठी त्याच मतदारसंघातील पात्र सभासदांमधून संचालकांची निवड करणेबाबत.**

सभेचा आवश्यक कोरम पूर्ण झालेनंतर सभेचे कामकाज सुरू करण्यात येवून समेत नमित्तिक रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणुक कार्यक्रम**

| अ. क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्विकृती | स.११.३० ते १२.०० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | दु. १२.०० ते १२.२० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी (निवडणुकीची आवश्यकता नसल्यास निकाल घोषीत करणे) | दु.१२.२० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दु.१२.२५ ते १२.४० |
| ५ | अंतिम उमेदवारांची यादी जाहिर करणे | दु. १२.४५ |
| ६ | मतदान प्रक्रिया | दु. ०१.०० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | मतदाना नंतर लगेच |
| ८ | निवडुन आलेल्या पदाधिकारी बाबत निकाल घोषित करणे | मतमोजणी नंतर लगेच |

टिप - निवडणुक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.
(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)
**सचिव**
**ठिकाण - भोकर**
**भोकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.**
**दिनांक २०/०७/२०२६.**
**भोकर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर**

## जाहीर प्रकटन

समस्त गावकरी कर्जत ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम जीवण पोपट जाधव रा भीगवण ता इंदापुर जि. पुणे. यांनी मुलगा नामे श्री श्रीम/ आर्यन जीवण जाधव यांचे नावे जन्म /मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू कर्जत ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि २०/०६/२०१८ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि ३/०२/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यत्कीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
शिक्का
**(रवि सतवन )**
**तहसिलदार कर्जत**

## जाहीर प्रकटन

मी श्री. गोकुळ छगन बर्डे रा. वांगी बुद्रुक ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर या जाहीर प्रकटनाद्वारे जाहीर करतो की, माझी मुलगी नामे आराध्या गोकुळ बर्डे हिचा जन्म दिनांक १८/१२/२०२० रोजी गावी वांगी बुद्रुक येथे झाला असुन, कुणाची काही हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत हरकत घ्यावी.

कु. आराध्या गोकुळ बर्डे हिच्या वडीलांचे नांव-गोकुळ छगन बर्डे व आई-मुक्ताबाई गोकुळ बर्डे असुन त्याबाबतचे रूपये ५००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्रही करून दिले आहेत. यावर कुणाची हरकत असेल तर ती ७ दिवसाच्या आत कळवावी ही विनंती.

दि. २०-७-२०२६

**आपला विश्वासु**
**सही/-**
**आधार नं. ८५२१ ५४६६ ८१३३**
**गोकुळ छगन बर्डे**



## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा; मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** अहिल्यादेवी होळकर शेतकरी पीक कर्जमुक्ती योजनेचा लाभ नियमित व थकीत अशा सर्व पात्र शेतकऱ्यांना कोणताही भेदभाव न करता सरसकट द्यावा, अशी मागणी पुणतांबा येथील बाळासाहेब चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या योजनेनुसार नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद आहे, तर थकीत पीक कर्ज असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. ही तरतूद नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय




करणारी असल्याचा आरोप त्यांनी केला. शेतीसाठी नांगरणी, बियाणे, खते, औषधे, मजुरी आदी सर्व खर्च प्रत्येक शेतकऱ्याला समानच करावा लागतो. नियमित कर्ज फेडण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना उसनवारी करावी लागते किंवा इतर बँकांकडून कर्ज घेऊन वेळेत परतफेड करावी लागते. त्यामुळे शासनाने कर्जमाफी देताना कोणताही दुजाभाव न करता नियमित आणि थकीत अशा सर्व पात्र शेतकऱ्यांना समान न्याय देत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी बाळासाहेब चव्हाण यांनी केली आहे.

## पान १ वरुन

## शिर्डीत फळ विक्रेत्या महिलेचा खुण

उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती यांनी सांगितले की, सदर घटना ही या महिलांच्या मागील वादावरून घडली असून आठच्या सुमारास मयत जयश्री ही काकडकैरी विकत असताना तिथे फिजा उर्फ नोझीया लुकमान पटेल रा. कालिकानगर, शिर्डी हिने तेथे येवून जयश्री हिचे बरोबर वाद घालण्यास सुरुवात केली असता जयश्री बरोबर वाद असलेल्या अंजली राजू खंडीझोड हिला फोन करून सांगितले की जयश्री ला मी पकडले आहे. अंजलीने फिजा हीस तिला सोडू नको तिला संपव असे सांगीतल्याने फिजा हीने आपल्याकडील चाकू काढून चाकुने पोटावर, पायावर, मांडीवर सपासप वार करण्यास सुरुवात केली. फिजाकडे असणारा चाकु अंजली हिने पुरवल्याचे भारती यांनी सांगितले. दरम्यान सदर महिलेला दोन लहान चिमुकली मुले असून तिचा पती गवंडी काम करत असल्याची माहिती मिळाली असून हल्ला करणारी फिजा उर्फ नोझीया लुकमान पटेल (वय २२) रा. कालिकानगर,अंजली राजू खंडीझोड (वय २१) रा. कालीकानगर शिर्डी यांना पोलीसांनी अटक केली असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ३१ लाखाचे एमडी ड्रग्स पकडले नगरमध्ये तिघांना अटक : दोघे फरार

एका अनोळखी इसमाचा पोलीस शोध घेत आहेत. या सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, शस्त्र कायदा आणि अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## बीडच्या बनावट ट्रस्टचे पाकिस्तानी कनेक्शन?

व्यवहार झाल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले असून, या व्यवहारांचा संबंध पाकिस्तानातील वादग्रस्त 'दावत-ए-इस्लामी' संस्थेशी असल्याचा संशय एटीएसने व्यक्त केला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.एटीएसच्या माहितीनुसार, बार्शीतील 'अल हलिमी' या कथित बनावट ट्रस्टचे पाकिस्तानातील वादग्रस्त 'दावत-ए-इस्लामी' संस्थेशी तसेच दहशतवादी शहजाद भट्टी गँगशी संबंधित व्यक्तींशी संपर्क असल्याच्या अनुषंगाने तपास सुरू आहे. त्याच तपासादरम्यान माजलगाव येथील 'गुलजार-ए-रजा' ट्रस्टचे या ट्रस्टसोबत आर्थिक संबंध असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणात माजलगाव येथील ट्रस्टविरोधात यापूर्वीच गुन्हा दाखल करण्यात आला असून काही आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच संबंधित संस्थेचे फॉरेन्सिक ऑडिट सुरू असून आर्थिक व्यवहारांची सखोल छाननी केली जात आहे. या तपासातून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता एटीएसने व्यक्त केली आहे.

## अश्रूधुराच्या नळकांड्या अन् विद्यार्थ्यांच्या नडघ्या फोडल्या!

अशा पद्धतीने पोलिसांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर अनेकांची डोकी सुद्धा फोडण्यात आली आहेत. दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना जंतरमंतरपासून केवळ एक किलोमीटर अंतरावर असलेल्या केरळ भवनापर्यंत मोर्चा काढण्याची परवानगी दिली होती. यावरुन दिल्ली पोलीस आणि आंदोलकांमध्ये वाद झाला. त्यामुळे शीघ्र कृती दलाच्या जवानांनी आंदोलकांवर लाठीमार केला. दिल्ली पोलीस आणि शीघ्र कृती दलाचे जवान आंदोलकांना झोडपत असल्याचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. एकीकडे संसदेत कामकाजाला सुरुवात होताच आंदोलक त्याठिकाणी जाण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यामुळे पोलिसांकडून लाठीमार करण्यात आल्याचे सांगितले जाते. कालपासूनच जंतरमंतरच्या परिसरात सुरक्षा दलांनी वज्र वाहन, वॉटर कॅनन आणि मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. आंदोलकांवर लाठीमार करण्यात आल्यानंतर परिसरात तणाव निर्माण झाला आहे. त्यामुळे या परिसरातील इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली आहे. तसेच दिल्ली परिसरात मोबाईल जॅमर्सची संख्याही वाढवण्यात आली आहे. दरम्यान, संसदेच्या कामकाजाला सुरुवात होताच विरोधकांनी सभागृहात नीट परीक्षा पेपरफुटीवरुन चर्चेची मागणी केली. मात्र, लोकसभा अध्यक्षांनी ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे विरोधकांनी संसदेत गोंधळ घातला. यामुळे लोकसभा अध्यक्षांनी लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केले. एकीकडे पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीमार करण्यात आला असला तरी दुसरीकडे मागच्या दाराने सरकारने कॉक्रोच जनता पार्टी आणि सोनम वांगचूक यांच्याशी चर्चा सुरु केल्याची माहिती आहे. सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांना आयुक्तांच्या कार्यालयात नेण्यात आले आहे. केंद्र सरकारचे काही प्रतिनिधी सोनम वांगचूक यांच्याशी रात्री उशिरा रुग्णालयात जाऊन चर्चा करण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता पुढे काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# भक्तिरसात न्हाली लोणी ; श्री जगन्नाथ रथयात्रेला हजारोंची उत्स्फूर्त उपस्थिती



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : लोणी परिसरात इस्कॉनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सव हजारो कृष्णभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. भगवान श्रीजगन्नाथ, बलदेव व सुभद्रा मातांच्या रथयात्रेने संपूर्ण लोणी परिसर हरिनामाच्या गजराने आणि ढोल-ताशांच्या निनादाने दुमदुमून गेला.

ओडिशातील जगन्नाथ पुरी येथे शतकानुशतके साजऱ्या होणाऱ्या या वैदिक परंपरेचा लाभ सर्व भाविकांना मिळावा, या उद्देशाने इस्कॉन गोगलगाव व लोणीच्या वतीने सलग चौथ्या वर्षी रथयात्रेचे आयोजन करण्यात आले. लोमेश्वर मंदिर, लोणी खुर्द येथून सुरू झालेली रथयात्रा लोणी गाव, डरकाधीश करिअर क्लासेस, स्वागत हॉटेल, पीएमटी गेट क्रमांक १ व २, पीएमटी मैदान असा मार्ग पूर्ण करून पुन्हा लोमेश्वर मंदिरात दाखल झाली. यावेळी सुमारे अडीच हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

डरकाधीश करिअर क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी फुलांच्या वर्षावाने रथाचे स्वागत केले. संस्थेचे संचालक विजय जाधव यांनी विद्यार्थ्यांसमवेत आरती करून भगवान जगन्नाथांची पूजा केली. यावेळी माजी मंत्री तथा आमदार अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनीही उपस्थित राहून पूजन केले.

स्वागत हॉटेलचे मालक रवीशेठ तापडिया यांनी भाविकांसाठी खीर व फ्रूट ज्यूसची व्यवस्था केली, तर पीएमटी गेट क्रमांक १ समोरील विखे पाटील कॉम्प्लेक्सच्या वतीने अल्पोपहार, सरबत व थंड पेयाचे वाटप करण्यात आले. पीएमटी परिसरातील हजारो डॉक्टरांनी रथ ओढण्याचा आणि इस्कॉनतर्फे वितरित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा लाभ घेतला. येथे सुवर्णाताई राजेंद्र विखे यांच्या हस्ते भगवान जगन्नाथांची पूजा करण्यात आली.

रथयात्रेची सांगता लोमेश्वर मंदिरात झाली. यावेळी लोणी खुर्दचे माजी सरपंच जनार्दन घोगरे व प्रभावतीताई घोगरे यांनी भगवान जगन्नाथांचे पूजन केले. हरिनाम संकीर्तन, ढोल-ताशांचा गजर आणि भाविकांच्या उत्स्फूर्त नृत्याने संपूर्ण लोणी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

## सोनम वांगचुकांचे आंदोलन दडपल्याच्या निषेधार्थ वैजापूरात विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : विविध स्पर्धा परीक्षा तसेच नीट व सीईटी प्रवेश परीक्षांमध्ये सातत्याने होत असल्याचा आरोप असलेल्या पेपरफुटीच्या घटनांचा निषेध करण्यासाठी आणि जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर केंद्र सरकारने दडपशाही केल्याचा आरोप करत त्याच्या निषेधार्थ सोमवारी (दि.२० जुलै रोजी)वैजापूर येथे

आंबेडकरवादी अन्याय अत्याचार विरोधी कृती समिती, वैजापूर शहर व ग्रामीण तसेच विद्यार्थी व पालक यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या मोर्चाची सुरुवात शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर मोर्चाने शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक दिली.

मोर्चादरम्यान आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, स्पर्धा परीक्षा प्रक्रिया पारदर्शक व विश्वासार्ह ठेवावी तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ तातडीने थांबवावा, अशा मागण्या करण्यात आल्या.



तसेच सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावरील कथित दडपशाहीचाही निषेध व्यक्त करण्यात आला.यानंतर आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांना सादर केले.या मोर्चात बाबासाहेब पगारे, सखाराम शिनगारे, राजेंद्र बागुल, सिद्धार्थ बागुल, राहुल संत, जुबेर चाऊस, प्रा. डॉ. आबासाहेब कसबे, सागर सोनवणे, बुद्धभूषण साळवे, साहेबराव पडवळ, जीवन पठारे, श्रीकांत जाधव, भीमराव महाले, राहुल साळवे, नामदेव त्रिभुवन यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

## स्कुटीला मागून पल्सरची धडक; एकाचा मृत्यू, एक जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : गंगापूर -- वैजापूर रोडवरील जाखमाथा जवळ सोमवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात स्कुटीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर पल्सरस्वार गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दीपक हरीभाऊ डोंगरे (वय ४०) हे २१ जुलै रोजी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास गंगापूर शहरातून स्कुटीने वैजापूरच्या दिशेने जात होते. विठ्ठल आश्रमाजवळील जाखमाथा परिसरात त्यांच्या स्कुटीला मागून भरधाव वेगाने येणाऱ्या टू-ट्वेंटी पल्सर दुचाकीने जोरदार धडक दिली.

या झालेल्या भीषण धडकेत दोन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दीपक डोंगरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात येत होते. मात्र, वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

डोंगरे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला असून, पल्सर स्वारावर गंगापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश जाधव करीत आहेत.

मृत दीपक हरीभाऊ डोंगरे यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार असून, त्यांच्या अकाली निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

## जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवंत विद्यार्थी घडतात :लक्ष्मण पंडोरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या माध्यमातून घडणारा प्रत्येक विद्यार्थी हा सर्वसाधारण कुटुंबातील असतो. शाळेचे शिक्षक आणि शासनाच्या सवलती यातून निश्चितच शिक्षण घेताना त्यांचा फायदा होतो. शिक्षकांच्या परिश्रमातूनच या शाळेचे विद्यार्थी गुणवंत होतात. आपली वेगळी ओळख निर्माण करतात, असे गौरवोद्गार कोपरगाव तालुक्यातील शिक्षण विभागाच्या वारी केंद्राचे केंद्रप्रमुख आदर्श शिक्षक लक्ष्मण पंडोरे यांनी काढले.

कोपरगाव तालुक्यातील वारी येथील राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सालाबाद प्रमाणे जिल्हा परिषदेच्या वारी, साकरवाडी व शिरसाठ वस्ती या तीन शाळेतील इयत्ता पहिलीच्या एकूण ९१ विद्यार्थ्यांना मोफत शब्दबाग उजळणी पुस्तकांचे, त्याचबरोबर वारी शाळेतील सुवर्णमहोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश, विविध स्पर्धा परीक्षांचे प्रमाणपत्र शनिवारी (दि.१८) लक्ष्मण पंडोरे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे यंदाचे हे सहावे वर्ष होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष पत्रकार रोहित टेके पाटील होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी कोपरगाव कृषी उत्पन्न



बाजार समितीचे संचालक प्रकाशराव गोर्डे, शिक्षणप्रेमी पालक सुहास भडांगे, ग्रा.पं.सदस्य प्रतिभा टेके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात पत्रकार रोहित टेके यांनी जिल्हा परिषद शाळेच्या गत पाच वर्षातील प्रगतीबद्दल उपस्थित पालकांना संबोधित केले. वेळी कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाशराव गोर्डे, मुख्याध्यापक चंद्रकांत माळी, ग्रा.पं.सदस्य प्रतिभा टेके, सोनाली महापुरे, व्यवस्थापन समिती सदस्य राजेश काबरा, सुरज टेके, प्राची जोशी, माजी उपसरपंच दिवाकर निळे, शर्मिला विधाते यांच्यासह पालक, महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण आहेर यांनी केले. तर मुख्याध्यापक चंद्रकांत माळी यांनी आभार मानले.

## निधन वार्ता

### कांताबाई राऊत



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** :श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील वारकरी सांप्रदायिक पंथाच्या गं भा कांताबाई अण्णासाहेब राऊत (वय ७१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहेत. त्यांच्या पश्चात मुले दोन, मुलगी एक, दिर, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते हरीभाऊ व रामभाऊ राऊत यांच्या त्या मातोश्री तर माजी कृषी अधिकारी शिवाजी व तान्हाजी राऊत यांच्या त्या भावजयी होत.

### गोविंदराव वैजापूरकर



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** :हरिगांव येथील ज्येष्ठ पत्रकार गोविंदराव वैजापूरकर (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने रविवारी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, ५ मुली, एक मुलगा, जावई , नातवंडे असा परिवार आहे.

## गाव तेथे स्मशानभूमी ग्रामविकास विभागाचा फतवा वाड्या वस्त्यांवर रस्त्यांविना अंत्यसंस्कार मरण यातना

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : राज्यातील ग्रामीण भागाचा विकास साधताना आता नागरिकांच्या मूलभूत आणि संवेदनशील गरजांना प्राधान्य देण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. ''गाव तेथे स्मशानभूमी'' या संकल्पनेची राज्यात अत्यंत कठोरपणे अंमलबजावणी केली जाणार आहे. ज्या गावांमध्ये अद्याप स्मशानभूमी किंवा अंत्यसंस्कारासाठी शेड उपलब्ध नाही अशा गावांचा इतर विकासकामांचा निधी रोखला जाण्याची शक्यता आहे. शासनाच्या या नव्या धोरणामुळे राज्यातील अनेक ग्रामपंचायतींसमोर पेच निर्माण झाला आहे.

विकासनिधी हवा असेल तर आधी स्मशानभूमीचा प्रश्न सोडवणे ग्रामपंचायत यांना बंधनकारक करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी देताना आता संबंधित गावात अंत्यसंस्काराची योग्य सुविधा आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाणार आहे. मूलभूत सुविधा पुरवण्यात कसूर करणाऱ्या ग्रामपंचायतींना इतर विकासकामांसाठी मिळणाऱ्या निधीवर याचा थेट परिणाम होणार आहे. त्यामुळे गावातील रस्ते, पाणी किंवा इतर कामांपूर्वी स्मशानभूमी उभारण्यासाठी ग्रामपंचायतींना पुढाकार घ्यावाच लागणार आहे.

ग्रामीण भागात स्मशानभूमी किंवा शेड नसल्याने मृताच्या नातेवाइकांना मरणानंतरही मरणयातना सोसाव्या लागत आहेत. पावसाळ्यात रस्त्यांचा सामना तर उन्हाळ्यात तीव्र उन्हात आडोसा नसतानाच नागरिकांना अंत्यसंस्कार करावे लागतात.

अनेक गावांमध्ये केवळ प्रशासकीय अनास्था नाही तर जमिनीची उपलब्धता नसणे हे मुख्य कारण बनले आहे. अनेक ठिकाणी स्मशान भूमिसाठी हक्काची सरकारी जमीन नाही, तर काही ठिकाणी खासगी जमीनदार जागा देण्यास तयार नाहीत. याशिवाय, गावातील अंतर्गत वाद आणि राजकारणामुळेही अनेक वर्षांपासून स्मशानभूमीचे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत.

गाव तेथे स्मशानभूमी प्रमाणेच प्रत्येक वाड्या वस्त्यावर शासनाने चांगले रस्ते उपलब्ध करून द्यावेत. पावसाळ्यात रस्त्यांचा सामना करून नागरिकांना अंत्यसंस्कार करावे लागते.

**Change In Name**

I, Afsana Aziz Shaikh, hereby declare that the names "Afsana Aziz Shaikh" and "Afsana Shaikh Aziz" refer to one and the same person. The variation in the order of my name is due to a spelling/name-order discrepancy. Henceforth, both names shall be treated as referring to the same individual for all legal and official purposes.
Ref. Adhar No. 446462796140

**पाहिजेत**

पुणतांबा (ता. राहाता ) येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेत त्वरित पदे भरणे आहेत. शाखाधिकारी एक, कॉशियर एक, क्लार्क एक, असे कर्मचारी त्वरित भरावयाचे आहे. तरी अनुभव असलेल्या इच्छूक उमेदवारांनी (दि.२७) जुलै २०२६ पर्यंत बाजारपेठ रोड पुणतांबा (ता. राहाता) येथील या संस्थेत इच्छूकांनी संपर्क साधावा.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME RUKSAR KHATOON (LEAVING CERTIFICATE) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS RUKSAR MOHAMMAD HAQNAWAZ ANSARI (AADHAR NO. 7014 6685 5939) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHIRASGAON
PLACE: SHIRASGAON
DATE : 20/07/2026

# एसआयआरचे काम एकाच ठिकाणी बसून करू नका; ना. विखे यांच्या सूचना



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियान अत्यंत गांभीर्याने राबविण्याची गरज असून, नियुक्त कर्मचाऱ्यांनी एकाच ठिकाणी बसून काम न करता प्रत्यक्ष गावागावांत जाऊन काम करावे, अशा स्पष्ट सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. संगमनेर विधानसभा मतदारसंघातील एसआयआर मोहिमेचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार अमोल खताळ, प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रदीप सिनारे तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी विविध गावांमध्ये बीएलओ आणि पक्षाच्या प्रतिनिधींमध्ये समन्वयाचा अभाव असल्याच्या तक्रारी समोर आल्या. शहरात काही ठिकाणी शासनाचे प्रतिनिधी दबावाखाली काम करत असल्याचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. याची गंभीर दखल घेण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या. मतदारसंघात सुमारे ५५ ते ६० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगत विखे पाटील यांनी उर्वरित कामाला गती देण्यासाठी पाच ते सहा गावे एकत्र करून विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले. महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतदारांशी थेट संपर्क साधून अभियान यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी आमदार अमोल खताळ यांनी आपल्या संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून एसआयआर मोहिमेला अधिक गती देण्यासाठी स्वतः लक्ष घालणार असल्याचे सांगितले. प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी कार्यकर्त्यांच्या शंकांचे निरसन केले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

मंगळवार दि .२१ जुलै २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>६६० | २-६ | १५०<br>२४०<br>३३० | जोड<br>२५-०६-४३-७९-६१ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १६९<br>५६७<br>३३० | ६-८ | १२५<br>२६०<br>४४० | जोड<br>६३-७८-४१-९२-८० |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-१ | १४६<br>१२८<br>११९ | जोड<br>५२-९१-४६-८९-८९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

## द•ख•ल

### रंगोत्सव २०२६ अंतर्गत राज्यस्तरीय खुली सोलो स्वगत स्पर्धा

**अहिल्यानगर :** हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने 'रंगोत्सव २०२६' अंतर्गत राज्यस्तरीय खुली सोलो स्वगत स्पर्धा रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी आयएमएससीडीआर ऑडिटोरियम, पहिला मजला, नगर कॉलेजसमोर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील हौशी कलाकार, रंगकर्मी आणि नाट्यप्रेमींना आपल्या अभिनय कौशल्याचे सादरीकरण करण्यासाठी ही स्पर्धा एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धेची प्रवेश फी १०० रुपये असून, विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ३,००० रुपये, द्वितीय क्रमांकास २,००० रुपये, तृतीय क्रमांकास १,००० रुपये, तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५०० रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक केक फाउंडेशन यांच्या सौजन्याने, द्वितीय पारितोषिक स्व. रंगकर्मी श्रीराम कुलकर्णी स्मरणार्थ, तर तृतीय पारितोषिक स्व. रंगकर्मी अनिलकुमार खळेकर स्मरणार्थ प्रदान करण्यात येणार आहे.

### डॉ.सप्तर्षींच्या निधनाने सामाजिक चळवळीची मोठी हानी : ना.विखे पाटील



**अहिल्यानगर :** जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार, ज्येष्ठ समाजवादी नेते, गांधीवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. आपल्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक वाटचालीत त्यांनी समाजातील सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवला. ग्रामीण जीवनाशी त्यांची असलेली नाळ त्यांच्या विचारांत आणि कृतीत कायम दिसून आली. शेतकरी, युवक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच परखड आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यातील मैत्री, परस्पर सन्मान आणि जिव्हाळ्याचे ऋणानुबंध अखेरपर्यंत कायम राहिले. त्यांच्या निधनाने सामाजिक आणि वैचारिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

### अल्पवयीन मुलाची कारला धडक : विनापरवाना गाडी चालवल्याने मालकासह चालकावर गुन्हा

**अहिल्यानगर :** बुरुडगाव रस्त्यावरील साईनगर कमानीसमोर एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रेल्वे पोलीस दलात कार्यरत असलेले बाबासाहेब रायभान गवळी हे आपल्या चारचाकी वाहनाने जात असताना हा अपघात झाला. एका अल्पवयीन मुलाने पाठीवर मर्यादेपेक्षा जास्त प्रवासी बसवून, वाहतुकीच्या नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आपली दुचाकी अत्यंत भरधाव वेगाने चालवली. त्याने गवळी यांच्या चारचाकी वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात चारचाकी वाहनाचे मोठे नुकसान झाले असून, दुचाकी चालवणारा अल्पवयीन मुलगा यश सागर चव्हाण हा देखील जखमी झाला आहे. त्याला उपचारासाठी तातडीने फाटके रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चौकशीत असे समोर आले की, त्या अल्पवयीन मुलाकडे वाहन चालवण्याचा कोणताही परवाना (लायसन्स) नव्हता. तरीही दुचाकीचा मुख्य मालक रमेश कुंकुलाल काळे याने बेजबाबदारपणे आपली गाडी त्याला चालवण्यासाठी दिली होती. या संपूर्ण घटनेनंतर फिर्यादी बाबासाहेब गवळी यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी दुचाकीचा मूळ मालक रमेश कुंकुलाल काळे आणि अल्पवयीन चालक यश सागर चव्हाण या दोघांच्या विरोधात निष्काळजीपणा आणि धोकादायक पद्धतीने वाहन चालवल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार डाके या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### कलाकेंद्राच्या नावाखाली १ लाख ३५ हजारांची फसवणूक ; दोन महिलाविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** केडगाव परिसरातील मराठानगर येथे एक धक्कादायक फसवणूक आणि चोरीची घटना समोर आली आहे. कलाकेंद्रातील कार्यक्रमासाठी आगाऊ रक्कम घेऊनही कामावर न जाता विश्वासघात केल्याप्रकरणी आणि घरातील कपाटातून रोकड चोरल्याप्रकरणी दोन महिलांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कोमल नंदा काळे (वय २७, रा. मराठानगर, भाग्योदय मंगल कार्यालयाजवळ, केडगाव, अहिल्यानगर) यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी पूजा भोसले आणि दिव्या बनसोडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी कोमल काळे यांनी आरोपी पूजा आणि दिव्या यांना कलाकेंद्रातील पार्टीमध्ये काम करण्यासाठी आगाऊ रक्कम (उचल) म्हणून १ लाख रुपये रोख दिले होते. मात्र, दोन्ही आरोपी महिलांनी फिर्यादीचा विश्वासघात केला आणि ठरल्याप्रमाणे कलाकेंद्राच्या पार्टीमध्ये काम न करताच तिथून निघून गेल्या. इतकेच नव्हे तर, घरातून जाताना आरोपींनी कपाटात ठेवलेली ३५,००० रुपयांची रोकडही फिर्यादीच्या संमतीशिवाय बेकायदेशीरपणे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरून नेली. एकूण १ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक आणि चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर कोमल काळे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेतली. कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी फसवणूक व चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पो. नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. फौ. गोविंद गोल्हार करत आहेत.

### जिल्हा वाचनालयातर्फे २ ऑगस्टला चित्रकला स्पर्धा

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे वतीने दरवर्षी प्रमाणे इ. १ली ते २ री, इ ३ री ते इ.४ थी, व ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. ०२ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा तीन गटात होणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र ठाकूर, प्रमुख कार्यवाह विक्रम अनिलभैय्या राठोड यांनी दिली. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे वतीने घेण्यात येणारी ही स्पर्धा बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला, नवीपेठ येथे रविवार रोजी सकाळी १० ते ११.३० या वेळात होईल. स्पर्धकांना चित्रे काढण्यासाठी कागद आयोजकांतर्फे देण्यात येईल. चित्रे काढून रंगवण्यासाठी आवश्यक असलेले इतर सर्व साहित्य प्रत्येकाने स्वतः आणावयाचे आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येकी रु.१० असुन त्याची नाव नोंदणी शनिवार पर्यंत वाचनालयात करावी. गट क्रमांक १.इयत्ता १ ली व २ री साठी विषय- १) कोणतेही एक फळ २) आवडते फूल, ३) आवडती खेळणी, गट क. २. इ. ३ री ते ४ थी साठी विषय १) मंदिर २) रांगोळी ३) वाढदिवसाचा केक, गट क.३ इ.५ वी ते ७ वी साठी विषय १) शेतकरी व त्यांचे कुटुंब २) फुटबॉल खेळणारी मुले ३) सहल तीन गटातील स्पर्धकांसाठी वरील विषय देण्यात आलेले आहेत. चित्र रंगवण्यासाठी मुलांनी तेलकट खडू स्केचपेन किंवा रंगीत पेन्सिली याचाच वापर करावा.

# मिरीची तहान कधी भागणार ; तीन आठवड्यांनंतरही पाणी नाही

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** ऐतिहासिक वारसा लाभलेले आणि पाथर्डी तालुक्यातील प्रमुख गाव म्हणून मिरी गावाची ओळख आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून पिण्याच्या पाण्याची भिषण पाणी टंचाई जाणवत असून मिरी गावाची आज वेगळीच ओळख निर्माण झाली आहे. एकेकाळी राजकीय व सामाजिक क्षेत्रात नावाजलेल्या मिरीकर घराण्यामुळे प्रसिद्ध असलेले हे गाव सध्या तीव्र पाणीटंचाईमुळे चर्चेत आहे.

पूर्वी कडगाव येथील ढोरा नदीवरून पाईपलाईनद्वारे गावाला पाणीपुरवठा केला जात होता. त्यानंतर वाढत्या पाणीटंचाईवर उपाय म्हणून तत्कालीन ग्रामविकास मंत्री अण्णा डांगे मढी ता. पाथर्डी येथे आले असता पंचायत समितीचे सभापती मिर्झा मणियार मिरीचे सरपंच लाला जोशेकर राजू तागड व जिल्हा परिषद सदस्य मोहन पालवे यांनी त्यांना निवेदन देऊन निधी देण्याची मागणी केली. या मागणीस कै. खा. बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुढाकारातून आडगाव येथे विहीर घेऊन स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. या योजनेमुळे अनेक वर्षे मिरीकरांना नियमित व मुबलक पाणी मिळत होते. त्या काळात गाव अक्षरशः हंडामुक्त झाल्याची भावना ग्रामस्थ आजही व्यक्त करतात.

> मिरीच्या पाणी योजनेच्या टाकीचे काम पूर्ण झाले आहे. गावठाण भागात पाणी वितरणासाठी पाईप टाकल्यानंतर लवकरात लवकर मिरी ग्रामस्थांना पाणी देण्यासाठी पाणी पुरवठा विभाग काम करत आहे.
>
> **ए. एस हुगे (उपअभियंता, जिप पाणी पुरवठा विभाग. पाथर्डी)**



मात्र गेल्या काही वर्षांत लोकसंख्या वाढ, जुन्या योजनेची घटलेली क्षमता आणि नवीन योजना रखडल्यामुळे परिस्थिती पुन्हा गंभीर बनली आहे. सध्या गावात २० ते २२ दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. त्यामुळे पावसाळ्यातही महिलांच्या डोक्यावर हंडे दिसत असून अनेक कुटुंबांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे.

**४.५ कोटीची योजना**

साडेसात हजार लोकसंख्या असलेल्या मिरी गावाला सततच्या पाणीटंचाईची समस्या भेडसावत असल्यामुळे तत्कालीन आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडून सुमारे साडेचार कोटींची पाणी योजना मंजूर करण्यात आली. यामध्ये स्वतंत्र पाईपलाईन चार पाण्याच्या टाक्या मिरी गावासह वाडी वस्तीवर पाण्याचे नियोजन करण्यात आले. मात्र ही योजना निकृष्ट काम , वारंवारं तुटफुट तसेच अनियमित कामामुळे चांगलीच वादग्रस्त ठरली.या योजनेतून पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे ती जुन्या पाईपलाईनला जोडली व तिचीही चाळणी झाली आणि त्यामुळेच सध्या गावाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**पाणी टंचाईमुळे व्यापाऱ्यांचे स्थलांतर**

गेल्या काही दिवसांपासून मिरी गावाला भीषण पाणीटंचाई जाणवत असल्यामुळे अनेक सुशिक्षित व्यापारी वर्ग स्थलांतरित झाला आहे मिरी गावातील सुमारे ३० ते ३५ व्यापाऱ्यांनीस्थलांतर केले आहे तर अनेक कुटुंबे ही पाण्याच्या दुर्भिक्षामुळे शेतात राहायला गेली आहे.

ऐतिहासिक गावाची तहान अखेर कधी भागणार असा प्रश्न मिरी ग्रामस्थांना सतावत आहे.

> स्वतंत्र ४.५ कोटी रुपयांच्या योजनेतील कामांची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर निश्चित करून उर्वरित काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई करून गावाला लवकरात लवकर पाणी उपलब्ध करून द्यावे.
>
> **संतोष शिंदे (माजी सरपंच,मिरी)**

**आश्वासने भरपूर... पाणी नाही**

मिरी गावातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन अनेक वेळा देण्यात आले. मात्र आजही गावाला नियमित पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. गावासाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांचे योग्य नियोजन झाले असते, तर आजची परिस्थिती उद्भवली नसती, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, आडगाव पाणीपुरवठा योजना सुरू असतानाच मिरी-तिसगाव प्रादेशिक नळपाणी योजनेचाही पर्याय उपलब्ध होता. मात्र त्या योजनेचा लाभ का घेण्यात आला नाही,ग्रामपंचायत ने ठराव करून आम्हाला मिरी- तिसगाव या योजनेचे पाणी नको असे का केले असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. त्यानंतर जलजीवन मिशनअंतर्गत सुमारे साडेचार कोटी रुपयांची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. मात्र या योजनेतील कामे संथ गतीने झाली असून काही कामांच्या दर्जाबाबतही ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## सुपा परिसरातील राजकीय वातावरण पेटले

### ग्रामपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** पारनेर तालुक्यातील ८८ ग्रामपंचायतींपैकी सुपा परिसरातील ग्रामपंचायतींच्या सरपंचांचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ अखेर संपुष्टात आला असून, सध्या या ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांमार्फत सुरू आहे. आता ग्रामपंचायत निवडणुकांचे पडघम वाजू लागल्याने संपूर्ण सुपा परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून गावागावांत इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणीला वेग दिला आहे.

**औद्योगिक वसाहतीमुळे चुरस वाढणार**

सुपा औद्योगिक वसाहतीमुळे परिसरातील अनेक गावांमध्ये लोकसंख्या, मतदारसंख्या आणि विकासाच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. उद्योगधंद्यांमुळे निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांच्या गरजा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, स्ट्रीट लाईट, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, नियोजन आणि नागरी सुविधा हे यंदाच्या निवडणुकीतील प्रमुख मुद्दे ठरणार आहेत.

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यासाठी एप्रिल २०२६ मधील मतदार यादी ग्राह्य धरून प्रत्येक गावातील वार्डनिहाय मतदारांची नोंदणी व पडताळणी सुरू आहे. प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी गावोगावी जाऊन मतदार याद्या अद्ययावत करत असून, ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

मतदार यादी अंतिम झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यातग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गावागावांत राजकीय हालचालींना वेग आला असून, विविध गट-पॅनेलची जुळवाजुळव, कार्यकर्त्यांच्या बैठका, उमेदवारांची चाचपणी आणि प्रचाराची प्राथमिक तयारी सुरू झाली आहे. अनेक गावांमध्ये इच्छुक उमेदवारांनी घरभेटी, संपर्क अभियान आणि मतदारांशी संवाद सुरू केल्याने निवडणुकीचे वातावरण दिवसेंदिवस रंगत आहे.

## रामानंद संप्रदायाच्या देशव्यापी वृक्षारोपण संकल्पाला नगरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत तसेच जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेतून केडगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमात विविध मान्यवरांसह रामानंद संप्रदायाचे भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले आणि वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाचा संकल्प करण्यात आला. यावेळी मनपा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचे खरे महत्त्व संपूर्ण जगाने अनुभवले. त्या काळात कृत्रिम ऑक्सिजनसाठी मोठा खर्च करावा लागत होता, तर ऑक्सिजनच्या अभावामुळे अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले. मात्र, वृक्ष आपल्याला चोवीस तास मोफत नैसर्गिक ऑक्सिजन देतात. कोरोनानंतर वृक्षांचे महत्त्व सर्वांना पटले असले, तरी समाजात अजूनही वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाबाबत व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून संपूर्ण शहर हरित करण्याचा संकल्प करण्यात आला असून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जात आहे.

## विद्यार्थी-युवकांच्या न्याय हक्कासाठी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** राज्यातील विद्यार्थी व युवकांच्या न्याय हक्कासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कथित अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अहिल्यानगर शहर व जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देत सरकारने विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील व देशातील लाखो विद्यार्थी आणि युवकांचे भविष्य धोक्यात आलेले असतानाही सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. आजचा विद्यार्थी आणि युवक हा देशाचा भविष्यकाळ असूनही सरकारचे शैक्षणिक धोरण आणि युवकांच्या प्रश्नांबाबतचे धोरण अत्यंत उदासीन व निराशाजनक असल्याचा आरोप करण्यात आला. स्पर्धा परीक्षांचे वारंवार फुटणारे पेपर, भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी, पोलीस भरतीतील उमेदवारांवर होत असलेला अन्याय आणि विद्यार्थी-युवकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सरकारने केलेले दुर्लक्ष यामुळे राज्यभरात संतापाची लाट निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याऐवजी सरकार जबाबदारी झटकत असल्याची टीकाही करण्यात आली.

## बुद्धिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला. तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत देशभरातील बुद्धिबळपटूंनी आपल्या बुद्धिमत्तेचा कस लावत उत्कंठावर्धक सामने खेळले. हे सामने पाहण्यासाठी नगरकरांनी गर्दी केली होती.देशाचे भावी ग्रँडमास्टर पाहण्याची संधी मिळाली. अंदाजे आठ राज्ये, १७ जिल्ह्या मधून आलेल्या खेळाडू पालक व कोचेस ने अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या आयोजना वर व भोजन व्यवस्थेवर समाधान व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, अनुराधा बापट, प्रकाश गुजराथी, रोहिणी आडकर, शुभदा ठोंबरे, संजय खडके, स्वप्निल भगूरकर, नवनीत कोठारी, अतुल कोठारी, कौस्तुभ ठोंबरे, विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, दीपक चव्हाण, डी. बी. चौरे, शार्दुल तापसे, देवेंद्र ढोकळे, शिरीष इंदलकर, प्रशांत धंगेकर, गायत्री कुलकर्णी यांच्यासह खेळाडू, पालक व बुद्धिबळप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला शिक्षकांचा पाठिंबा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** देशातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करण्याच्या मागण्यांसाठी दिल्लीच्या जंतर-मंतर येथे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला माध्यमिक शिक्षक संघ आणि अहिल्यानगर मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीने जाहीर पाठिंबा दर्शविला. या आंदोलनात समन्वय समितीचे अध्यक्ष सुनिल पंडित, सचिव आप्पासाहेब शिंदे, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सचिव अमोल ठाणगे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, सोपानराव कदम, प्रसाद सामलेटी, मंगेश पालवे, अमोल ठाणगे, वैभव सांगळे, तौसिफ शेख, रविंद्र पायमोडे, गोवर्धन पांडुळे, राहुल झावरे, प्रकाश पोटे, फारूक रंगरेज यांच्यासह विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्र शासनाला देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, दिल्लीच्या जंतर-मंतर येथे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक, विविध विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी आणि युवक संघटनांचे प्रतिनिधी आमरण उपोषण करीत आहे.

## सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ 'एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन'

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पर्यावरणवादी, वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर केंद्र सरकारकडून दडपशाही केली जात असल्याचा आरोप करत, त्यांच्या समर्थनार्थ शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी देशभरातील तसेच परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीयांनी 'एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन' करावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आले आहे. हे आंदोलन हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात असून लोकशाही, संविधान, अहिंसा आणि नागरिकांच्या शांततामय आंदोलनाच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे.

# साईसेवा घोटाळ्यात नवे धक्कादायक दावे

## मल्टिस्टेटचे स्वतंत्र बँक खातेच नाही?

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील कथित साईसेवा आर्थिक घोटाळ्यात नवे गंभीर दावे समोर येत आहेत. साइसेवा मल्टिस्टेटचे कोणत्याही बँकेत स्वतंत्र खाते नसून, तिचे व्यवहार साइसेवा बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्थेतील खाते क्रमांक ७२९ द्वारे होत असल्याची माहिती पुढे येत आहे. या दाव्यांची अधिकृत चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी ठेवीदारांकडून केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दरम्यानच्या काळात साईसेवा मल्टिस्टेटच्या ठेवीदारांना पतसंस्थेतील कर्जवसुलीमधून ठेवी परत करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे कोणत्या संस्थेची वसुली कोणत्या संस्थेच्या ठेवीदारांना देण्यात आली, तसेच कर्ज व वसुलीचा ताळमेळ नेमका कसा ठेवला गेला, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याशिवाय, हातावरील रोख रकमेतील तफावत, विनातारण कर्जवाटप, तसेच नातेवाईकांना मोठ्या प्रमाणात कर्जे दिल्याचे आरोपही समोर येत आहेत. या सर्व बाबींमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये मोठी तफावत निर्माण झाल्याचा आरोप ठेवीदारांकडून करण्यात येत आहे. परिणामी, सर्वसामान्य नागरिकांची आयुष्यभराची बचत अडकून पडली असून हजारो कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत.या पार्श्वभूमीवर ठेवीदारांनी सहकार विभागाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८८ अंतर्गत जबाबदारी निश्चित करून दोषी संचालक व संबंधित पदाधिकाऱ्यांच्या मालमत्तेवर कारवाई करावी, आवश्यक असल्यास मालमत्ता विकून ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळवून द्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू असून, न्यायालयीन प्रक्रियेकडे ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

## पतसंस्थेतील खाते क्रमांक ७२९ वरून व्यवहार झाल्याचा आरोप; कलम ८८ अंतर्गत कारवाईची ठेवीदारांची मागणी

**नेत्यांनीच बुडवली साईसेवा? विनातारण कर्जवाटप ठरले पतसंस्थेच्या बुडण्याचे कारण?**

श्रीगोंदा तालुक्यातील काही प्रभावशाली राजकीय नेत्यांना नियमबाह्य व विनातारण कर्जवाटप करण्यात आल्याने साइसेवा बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्थेची आर्थिक घडी विस्कटल्याची चर्चा ठेवीदारांमध्ये सुरू आहे. या कथित कर्जवाटपामुळे कोट्यवधी रुपयांची थकबाकी निर्माण झाली असून, त्याचा फटका मात्र सर्वसामान्य ठेवीदारांना बसल्याचा आरोप होत आहे.ठेवीदारांच्या मते, ज्या नेत्यांना मोठ्या प्रमाणावर कर्जवाटप झाले, त्यांच्या कर्जखात्यांची स्वतंत्र चौकशी करून थकबाकीची वसुली करावी आणि गैरव्यवहार आढळल्यास संबंधितांवर स्वतंत्र फौजदारी गुन्हे दाखल करावेत. तसेच या कर्जांना मंजुरी देणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांची जबाबदारीही निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.नेत्यांना लाभ, ठेवीदारांना फटका अशी भावना व्यक्त करत, ठेवीदारांनी या संपूर्ण व्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# बियाणे, खते व कीटकनाशकांबाबत तक्रारींचे सात दिवसांत होणार निराकरण

## तालुकास्तरीय तक्रार निवारण समितींची फेरररचना – कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशके उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या तक्रारींचे जलद व पारदर्शक पद्धतीने निराकरण करणे हे राज्य शासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली असून, शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष शेतावर जाऊन तपासणी करून अहवाल अंतिम करण्यात येणार आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.कृषी मंत्री श्री. भरणे म्हणाले की, खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेबाबत तसेच बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत काही तक्रारी प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा तक्रारींचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण व्हावे, यासाठी शासनाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची सुधारित रचना लागू केली आहे.

या समितीच्या अध्यक्षस्थानी तालुका कृषी अधिकारी असतील. समितीत कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र किंवा कृषी विज्ञान केंद्राचा प्रतिनिधी, महाबीजचा प्रतिनिधी तसेच संबंधित कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वस्तुनिष्ठ तपासणी होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

भरणे म्हणाले की, तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित कंपनीचे प्रतिनिधी आणि विक्रेत्यांना तपासणीवेळी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांकडील खरेदीच्या पावत्यांची पडताळणी करून विहित नमुन्यात पंचनामा करण्यात येईल. तसेच संबंधित बियाण्यांच्या लॉटचे नमुने अधिसूचित प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. यामुळे तक्रारींची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर नियमानुसार कारवाई करणे सुलभ होईल.तालुक्यात तक्रारींची संख्या १०० पेक्षा अधिक झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली असून, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना तातडीने समित्या गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठा उपलब्ध करून देणे, दोषी उत्पादक किंवा विक्रेत्यांवर कठोर कारवाई करणे आणि प्रत्येक तक्रारीचे वेळेत निराकरण करणे यासाठी कृषी विभाग विशेष दक्षता घेणार असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले याबाबतचा शासननिर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे असेही ते म्हणाले.

द•ख•ल

## अडीवरे , बोरघर या गावांमध्ये अवैध दारूविक्रीचा सुळसुळाट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अडीवरे :** आंबेगाव तालुक्याच्या मावळ भागातील अडीवरे गावात अवैध दारूविक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर फोफावत असून एका एका गावात तब्बल पाच ते सहा ठिकाणी अवैधरित्या दारूची विक्री सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, यापैकी काही ठिकाणे शाळेच्या हाकेच्या अंतरावर असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गावातील महिला आणि नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासन तसेच पोलिसांकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, वारंवार तक्रारी करूनही या अवैध धंद्यांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अवैध दारूविक्रीमुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत असून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दारूच्या नशेत होणारे वाद-विवाद, भांडणे आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्नही वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शाळेजवळ सुरू असलेल्या या अवैध व्यवसायामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने तातडीने दखल घेऊन अवैध दारूविक्री बंद करावी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महिलांसह ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तक्रारींची दखल कधी घेणार? असा सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, लवकरात लवकर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.



## चिंचावले येथे विद्यार्थ्यांचा भक्तिमय दिंडी सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचावले येथे आषाढी पालखीनिमित्त इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर वारकरी संप्रदायाच्या भक्तिरसाने भारावून गेला.शाळेच्या शिक्षिका संगीता वाघोलीकर आणि सुजाता मेमाणे यांनी आकर्षक पालखी सजवून दिंडीचे नियोजन केले. दिंडीदरम्यान पारंपरिक रिंगण सोहळा पार पडला.

गावातील महिलांनी फुगड्या खेळत भक्तिमय वातावरणात आनंद व्यक्त केला, तर विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि पालकांनीही मोठ्या उत्साहाने दिंडीत सहभाग घेतला.शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधीर झेंडे यांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी परिसरातील व्यावसायिक दत्तात्रय नामदेव झेंडे व मालन दत्तात्रय झेंडे यांनी सपत्नीक पालखीचे पूजन करून विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. तसेच सुधीर झेंडे आणि दिलीप झेंडे यांनीही विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. भजन, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात दिंडीची सांगता झाली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संत संस्कृती, सामूहिक सहभाग आणि भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांची ओळख झाली. या उपक्रमाचे उपस्थित पालक, ग्रामस्थ आणि मान्यवरांनी कौतुक करत शाळेच्या अभिनव उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महारक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद..!

### एकूण १,४५६ रक्तदात्यांचे रक्तदान; समाजसेवेच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग..



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शारदा प्रांगण व विद्या प्रतिष्ठान या दोन केंद्रांवर पार पडलेल्या या शिबिरात तब्बल १,४५६ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपली. यामध्ये विद्या प्रतिष्ठान येथे २१७ तर शारदा प्रांगण येथे १,२३९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सदर रक्तदान शिबिर दरम्यान राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, युवा नेते जय पवार यांनी भेट दिली.

शिबिराच्या प्रारंभापासूनच रक्तदात्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. ज्येष्ठ नागरिक, युवक, युवती, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच महिला भगिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून अनेकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. प्रथमच रक्तदान करणाऱ्या युवक-युवतींची संख्याही लक्षणीय होती. महिलांचाही सहभाग उल्लेखनीय राहिल्याने संपूर्ण परिसर समाजसेवेच्या वातावरणाने भारावून गेला.यावेळी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, युवा नेते जयदादा पवार, पुणे जिल्हाध्यक्ष संभाजी होळकर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोळेकर, नगराध्यक्ष सचिन सातव, ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुशील सोमानी, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, माजी पुणे जिल्हाध्यक्ष विश्वासराव देवकाते, माजी नगराध्यक्ष सुभाष सोमानी, प्रसिद्ध व्यापारी किशोर सराफ, माजी नगराध्यक्षा भारती मुथा, दूध संघाचे चेअरमन किशोर फडतरे, तालुकाध्यक्ष संदीप बांदल यांच्यासह आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महिनाभर सामाजिक उपक्रमांची मालिका**

**दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने बारामतीमध्ये महिनाभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महारक्तदान शिबिर हा त्यातील प्रमुख उपक्रम ठरला. नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा स्व. अजितदादा पवार यांच्या समाजसेवेच्या विचारांवरील विश्वासाचे प्रतीक असल्याचे शहराध्यक्ष ड. किरण इंगळे यांनी सांगितले. तसेच पक्षाच्या वतीने ११ हजार वृक्षांचे वाटप करण्यात येणार असून आगामी काळातही समाजोपयोगी उपक्रमांची मालिका सुरू राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.**

**ॲड . किरण इंगळे**
(शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बारामती)

## महारक्तदान शिबिरात महिला उपनगराध्यक्षा नाळे यांचे रक्तदान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शारदा प्रांगण येथे आयोजित करण्यात आलेल्या महा रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सामाजिक उपक्रमात बारामती नगरपालिकेच्या महिला उपनगराध्यक्षा श्वेता नाळे यांनी रक्तदान करून समाजापुढे प्रेरणादायी आदर्श ठेवला.

रक्तदान हे सर्वोच्च समाजसेवेचे कार्य असून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे प्रभावी माध्यम आहे. या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या महा रक्तदान शिबिरात युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रक्तदान केले.



यावेळी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शिबिराला भेट देत रक्तदात्यांचे कौतुक केले. महिला उपनगराध्यक्षा श्वेता नाळे यांनी स्वतः रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल सुनेत्रा पवार यांनी त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे समाजात रक्तदानाबाबत जनजागृती होऊन अधिकाधिक नागरिक पुढे येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित या महा रक्तदान शिबिरातून सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देण्यात आला. रक्तदानासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे आयोजकांनी आभार मानत, भविष्यातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### देशी गोवंश संवर्धनावर पुण्यात उपक्रम

## ‘शाश्वत देशी गोपालन’ राष्ट्रीय परिसंवाद; १३ देशी गोवंश जातींचे प्रदर्शन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंती तसेच ‘शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिना’निमित्त कृषि महाविद्यालय, पुणे येथील अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात २० ते २२ जुलैदरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ‘शाश्वत देशी गोपालन’ राष्ट्रीय परिसंवाद, भव्य देशी गोवंश प्रदर्शन, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर, अवयवदान जनजागृती, तांत्रिक प्रात्यक्षिके आणि शेतकरी-शास्त्रज्ञ संवादाचा समावेश आहे.

उद्या बुधवार (ता.२२) होणाऱ्या या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार आदी उपस्थित राहणार आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रदर्शनात देशी गोवंशाच्या १३ जातींचे दर्शन घडणार असून, देशातील सर्वाधिक दूध देणाऱ्या देशी गाई, सर्वांत छोटी ‘पंगनूर’ गाय, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित पशुपालन तंत्रज्ञान, गो-परिक्रमा, गो-पर्यटन केंद्र आणि बायोगॅस आधारित दुग्ध प्रक्रिया युनिट ही प्रमुख आकर्षणे असतील. देशी गोवंश संवर्धनाला आधुनिक संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत पशुपालनाची जोड देणारा हा उपक्रम शेतकरी, पशुपालक, गोप्रेमी, संशोधक, कृषि विद्यार्थी आणि नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

२० व २१ जुलै रोजी होणाऱ्या राष्ट्रीय परिसंवादात देशी गोवंश संवर्धन, प्रजनन व्यवस्थापन, पशुपोषण, दुग्ध व्यवसाय, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवरील पशुपालन, सेंद्रिय शेती आणि मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थ यांसह विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. २१ जुलै रोजी मोफत आरोग्य तपासणी, स्वेच्छा रक्तदान शिबिर आणि अवयवदान जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषि महाविद्यालय, पुणे, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्हा परिषद पुणे, कात्रज दूध संघ आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम होत आहे. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टीतून उभारण्यात आलेले हे देशातील पहिले सर्वसमावेशक देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र असून, त्यासाठी सुमारे ७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. देशी गोवंश संवर्धन, संशोधन, प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाचे केंद्र म्हणून या प्रकल्पाचा विकास होत आहे.


## ग्रामपंचायत शेणवड तालुका राजगड जिल्हा पुणे

**बी १ जाहिर निविदा नोटीस नंबर ०१ सन २०२६-२०२७**

ग्रामपंचायत **शेणवड** तालुका राजगड जिल्हा पुणे हे खालील कामासाठी सीलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारकडून निविदा मागवित आहे मोहरबंद अर्ज दिनांक: २१-०७-२०२६ ते २७-०७-२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय **शेणवड** येथे स्वीकारली जातील. सदरच्या निविदा दिनांक: २८-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय **शेणवड** ता. राजगड या ठिकाणी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कामाची अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा. शुल्क | अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे शेणवड, ता. राजगड येथे जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना करणे. | ३७३५०५/- | ५९०/- | ३७३५/- | ६ महिने |

**अटी व शर्ती:** १) कोणतेही निविदा अर्ज स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळणेचा अधिकार ग्रा.प ने राखून ठेवला आहे,२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील, ३) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र, G.S.T प्रमाणपत्र, PAN कार्ड अनुभव प्रमाणपत्र व पूर्ण भरलेली निविदा जोडणे आवश्यक आहे, ४) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनादेश डी. डी **ग्रामपंचायत शेणवड** या नावाने काढून तो लिफाफा क्र १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येणार नाही. ५) सदरचे कामे हे मा. उपअभियंता, शाखा अभियंता जि.प बांधकाम उपविभाग राजगड व सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे., ६) काम पूर्ण झाल्यानंतरच कामाचे देयक अदा करण्यात येईल.

सही
ग्रामपंचायत अधिकारी

सही
सरपंच

**ग्रामपंचायत शेणवड ता. राजगड जि. पुणे**

## ग्रामपंचायत वांजळे तालुका राजगड जिल्हा पुणे

**बी १ जाहिर निविदा नोटीस नंबर ०१ सन २०२६-२०२७**

ग्रामपंचायत वांजळे तालुका राजगड जिल्हा पुणे हे खालील कामासाठी सीलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारकडून निविदा मागवित आहे मोहरबंद अर्ज दिनांक: २१-०७-२०२६ ते २७-०७-२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय वांजळे येथे स्वीकारली जातील. सदरच्या निविदा दिनांक: २८-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय वांजळे ता. राजगड या ठिकाणी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कामाची अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा. शुल्क | अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वांजळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर येथे सभागृह (सामाजिक सभागृह) बांधकाम करणे. | ८४४२९८/- | ५९०/- | ८४४३/- | ६ महिने |

**अटी व शर्ती:** १) कोणतेही निविदा अर्ज स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळणेचा अधिकार ग्रा.प ने राखून ठेवला आहे,२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील, ३) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र, G.S.T प्रमाणपत्र, PAN कार्ड अनुभव प्रमाणपत्र व पूर्ण भरलेली निविदा जोडणे आवश्यक आहे, ४) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनादेश डी. डी **ग्रामपंचायत वांजळे** या नावाने काढून तो लिफाफा क्र १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येणार नाही. ५) सदरचे कामे हे मा. उपअभियंता, शाखा अभियंता जि.प बांधकाम उपविभाग राजगड व सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे, ६) काम पूर्ण झाल्यानंतरच कामाचे देयक अदा करण्यात येईल.

सही
ग्रामपंचायत अधिकारी

सही
सरपंच

**ग्रामपंचायत वांजळे ता. राजगड जि. पुणे**


# संत निरंकारी मिशनचे राजेवाडी येथे रक्तदान शिबिर संपन्न



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** करुणा, प्रेम आणि सह-अस्तित्वाची भावना जेव्हा मानवी जीवनात जागृत होते, तेव्हा व्यक्ती स्वतःच्या स्वार्थाच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे प्रभावी माध्यम बनते. निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि परम श्रद्धेय निरंकारी राजपिताजी यांच्या प्रेरणेतून परोपकार, करुणा आणि मानवसेवेच्या उदात्त भावनेने संत निरंकारी मिशनतर्फे आज १९ जुलै रोजी राजेवाडी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात ३७४ युनिट रक्ताचे संकलन करण्यात आले. ससून रुग्णालय,औंध रुग्णालय तसेच निरंकारी रक्तपेढीच्या अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणी करून सुरक्षित, शिस्तबद्ध पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. संपूर्ण आयोजनामध्ये स्वच्छता, सुरक्षितता, नियोजन आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम केवळ रक्तदानापुरता मर्यादित न राहता मानवता, करुणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

शिबिराचे उद्घाटन मिशनचे प्रचारक अशोक कोऱ्हाळे तसेच दत्ता लांडगे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी राजेवाडी परिसरातील अनेक, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांनी शिबिरास सदिच्छा भेट देऊन संत निरंकारी मिशनच्या समाजोपयोगी कार्याचे मनापासून कौतुक केले. विशेष म्हणजे, संत निरंकारी मिशनची रक्तदानाची ही पवित्र सेवा-परंपरा गेल्या चार दशकांहून अधिक काळ अखंडपणे सुरू आहे. आतापर्यंत देशभरात ९,१७४ रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५,००,००० पेक्षा जास्त युनिट रक्त संकलित करण्यात आले असून, मानवसेवेसाठी मिशनची अटळ बांधिलकी यामधून अधोरेखित होते. युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांनी सत्य, साधेपणा आणि सद्भावनेचा मार्ग दाखवत तरुणांना नशामुक्त जीवनाचा स्वीकार करून आपली शक्ती समाजसेवेसाठी अर्पण करण्याचे आवाहन केले. त्यानंतर बाबा हरदेव सिंह जी महाराज यांनी रक्त नाड्यांतून वाहावे, नाल्यांतून नव्हे हा प्रेरणादायी संदेश देत रक्तदानाला जनआंदोलनाचे स्वरूप दिले. हाच मानवसेवेचा संदेश आजही सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे पुढे नेला जात आहे.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर ,रक्तदाते, स्वयंसेवक, वैद्यकीय अधिकारी तसेच आयोजनात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे स्थानिक शाखा मुखी हनुमंत थोरात यांनी मनःपूर्वक आभार मानले.



## वांगचुक यांच्या ताब्याविरोधात आंबेगावात निषेध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव :** शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनादरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या घटनेचा निषेध व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) युवक, आंबेगाव तालुक्याच्या वतीने तहसीलदार राहुल सारंग यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देशभरात सातत्याने घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांविरोधात सोनम वांगचुक हे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. अशा आंदोलनादरम्यान त्यांना पोलिसांनी ताब्यात घेणे हे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असून, भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या शांततापूर्ण आंदोलन व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर गदा आणणारे आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत भारत सरकारकडे या घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात यावा तसेच सोनम वांगचुक यांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करून त्यांच्यावरील कारवाई तातडीने थांबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) युवक आंबेगाव तालुका अध्यक्ष विशाल वाबळे, काँग्रेसचे अध्यक्ष अशोक काळे, विशाल भोर, आदेश काळे, स्मितेश येवले, अजय मुळूक आदी उपस्थित होते. निवेदन तहसीलदार राहुल सारंग यांना सादर करण्यात आले.


### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, विलास मधुकर कुटे मुक्काम पोस्ट वेहरगाव कार्ला लेणी, तालुका मावळ, जिल्हा पुणे ४१०४०५ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-१४ -HF-७१६२ असे असून त्याचा चासी नंबर ४७५७२, इंजिन नंबर ४७६३७ असा असून सदर दुचाकी वाहन हॉंडा ॲक्टिवा त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सुवर्णा विलास कुटे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-२१/०७/२०२६

**श्रीमती सुवर्णा विलास कुटे**
मुक्काम पोस्ट वेहरगाव कार्ला लेणी, तालुका मावळ,
जिल्हा पुणे ४१०४०५.

# द•ख•ल

## तिसगाव महामार्गालगत श्रमदानातून वेड्या बाभळीची सफाई



**तिसगाव :** तिसगाव येथील महामार्गालगत डिव्हायडरच्या बाजूने मोठ्या प्रमाणात उगवलेल्या वेड्या बाभळीमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. काटेरी फांद्या रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनांना घासत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला होता. अनेक प्रवाशांनाही किरकोळ दुखापती होत होत्या. याबाबत महामार्ग प्रशासन तसेच तिसगाव ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नव्हती. तिसगाव ही मोठी व्यापारी बाजारपेठ असल्याने या मार्गावर नेहमीच मोठी वाहतूक असते. तसेच डिव्हायडरवर काही दुकानदारांकडून कचरा टाकला जात असल्याने परिसर अस्वच्छ झाला होता. या सामाजिक उपक्रमाबद्दल नागरिकांनी संबंधित कार्यकर्त्यांचे कौतुक करत आभार व्यक्त केले. तसेच महामार्ग परिसराची नियमित स्वच्छता, डिव्हायडरवरील कचरा हटविणे आणि भविष्यात अशा समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी महामार्ग प्रशासन व ग्रामपंचायतीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर : पाटील

**कर्जत :** बुधवार रोजी दादा पाटील महाविद्यालयाच्या शारदाबाई पवार सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर आयोजित करण्यात आले असून या कार्यक्रमासाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार निलेश लंके, आमदार रोहित पवार, विधान परिषदेचे आमदार सुनील कर्जतकर उपस्थित राहणार असून पात्र लाभार्थ्यांना विविध दाखल्याचे वाटप होणार आहे. या कार्यक्रमासाठी कर्जत-जामखेडच्या सर्वसामान्य नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने बुधवार रोजी सकाळी ९:३० वाजता कर्जत दादा पाटील महाविद्यालयाच्या शारदाबाई पवार सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात कर्जत-जामखेड मतदारसंघातील शासनाच्या विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सभापती राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली खासदार निलेश लंके, आ. रोहित पवार, विधान परिषदेचे आ. सुनील कर्जतकर यांच्या उपस्थितीत दाखल्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

## मांडवे शाळेत चिमुकल्यांचा दिंडी सोहळा



**नगर तालुका :** ज्ञानोबा माऊली तुकाराम चा जय घोष व हाती टाळ मृदुंग आणि खांद्यावर भगव्या पताका घेतलेल्या चिमुकल्या वारकऱ्यांच्या दिंडी सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडवे येथे आयोजित करण्यात आलेला दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. शाळेच्या मैदानावरून विठ्ठल -रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन करून या दिंडी सोहळ्याचे प्रस्थान झाले. पारंपारिक वारकरी पोशाखात नटलेले बाल वारकरी डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि त्यांना साथ देणारे गावातील भजनी मंडळ व ग्रामस्थ यांच्यामुळे सोहळ्याला रंगत आली होती. मांडवे येथील सर्व भजनी मंडळी आणि समस्त ग्रामस्थ बंधू - भगिनींनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून चिमुकल्यांच्या उत्साह वाढवला. या दिंडी सोहळ्यासाठी सर्व शिक्षक तसेच शालेय व्यवस्थापन समितीने परिश्रम घेतले. ग्रामस्थांनी आणि शिक्षकांनी दिंडी सोहळा संपल्यानंतर चिमुकल्यांसाठी भोजन व्यवस्था केली होती.

## मनुष्याने जीवनात एकदा तरी पायी दिंडी करावी : महाराज तुपे



**शिराळ चिचोंडी :** पाऊले चालती पंढरीच्या वाटेविठ्ठल नामाच्या गजरातया दुर्गा देवी देवस्थान पायी दिंडी मिरजगाव मुक्कामी असताना, प्रवचन रुपी सेवेत सांगताना महाराज म्हणाले की,प्रत्येक मनुष्यांनी एकदा तरी पंढरीची पायी दिंडी करावी म्हणजेच माणसांना पुण्य मिळते,व चंद्रभागेचे स्नान करावेत्यांनी अनेकदृष्टांत देऊनपंढरपूरच्यापायी दिंडीचे महत्त्व सांगितले. यावेळी ह भ प अरुण महाराज गोरे,ह भ प भाऊसाहेब महाराज काकडे,ह भ प रामदास महाराज गोरे, ह.भ.प. आदिनाथ महाराज मुळे,नामदेव गोरे,पप्पू गोरे,बाळासाहेब घोरपडे,शिवाजी घोरपडे,रोहिदास बोरुडे,उद्धव गोरे मेजर चांगदेव तुपे,तसेच गावातील ३२५ वारकरी दिंडीत सहभागी झाली होते.

## महात्मा फुले विद्यालयात गुरुकुल पालक मेळावा




**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील महात्मा फुले विद्यालयात गुरुकुल पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल कमिटीचे सदस्य अशोक रोहोकले होते.यावेळी स्कूल कमिटीचे सदस्य संदीप रोहोकले उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये आजचे पालक हे जागृत झाले आहेत. यावेळी सागर राख, उत्तम फंड, निशिकांत रोहोकले, चेमटे वनिता, प्रकाश लकडे, भिकाजी चेमटे आदी उपस्थित होते. पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. गुरुकुल प्रमुख श्री. गहाणंडुले सर यांनी पीपीटी द्वारे शाळेची माहिती दिली. सूत्रसंचालन रोहोकले एस.एस. यांनी केले. आभार गहाणडुले सर यांनी मांडले. मेळाव्यासाठी भाळवणी परिसरातील बहुसंख्य पालक व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# सौर ऊर्जा प्रकल्प असूनही जेऊर पंचक्रोशी अंधारात

## सायंकाळी वीज गायब, दिवसभर लपंडाव; विद्यार्थी, शेतकरी व महिलांचे हाल!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** जेऊर येथील घुरुडी डोंगरावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून या प्रकल्पामुळे परिसरातील गावांना २४ तास अखंड वीजपुरवठा मिळेल असा दावा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात जेऊर पंचक्रोशीतील नागरिकांना दररोज सायंकाळी होणाऱ्या लोडशेडिंगचा व दिवसभर सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान !**

सायंकाळी वीज जात असल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यास खोळंबत आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. विजेअभावी विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

जेऊर, बहिरवाडी, ससेवाडी, इमामपूर, धनगरवाडी, डोंगरगण तसेच परिसरातील इतर वाड्या-वस्त्यांमध्ये दररोज संध्याकाळच्या महत्त्वाच्या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. स्वयंपाक बनविणे, विद्यार्थ्यांचा अभ्यास, घरगुती कामे तसेच लहान उद्योगधंदे यावर याचा मोठा परिणाम होत आहे. दिवसभरही वीज कधी येते तर कधी जाते त्यामुळे विद्युत उपकरणांचेही नुकसान होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

अनेक वाड्यांवर रात्री संपूर्ण अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. रस्त्यांवर दिवे नसल्याने नागरिकांना ये-जा करताना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरात यापूर्वी बिबट्याचे दर्शन झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

**सौर ऊर्जा प्रकल्प असूनही अंधार कायम !**

घुरुडी डोंगरावरील सौर ऊर्जा प्रकल्पामुळे गावागावांत अखंड वीज मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र आजही रोज सायंकाळी वीज गायब होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

त्यामुळे अंधाराच्या परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सौर ऊर्जा प्रकल्प उभारल्यानंतर परिसरातील वीज समस्येचा कायमस्वरूपी अंत होईल अशी अपेक्षा होती. मात्र आजही वारंवार होणारे भारनियमन आणि अनियमित वीजपुरवठा यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. तातडीने लोडशेडिंग बंद करून जेऊर पंचक्रोशीतील सर्व गावांना २४ तास अखंड वीजपुरवठा करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# राशीनमध्ये धोकादायक वीजवाहिन्यांकडे महावितरणचे दुर्लक्ष!

## तातडीने सर्वेक्षण व दुरुस्तीची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**राशीन :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राशीन परिसरातील अनेक गावांमध्ये महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. अनेक ठिकाणी वीज खांबांवर वेलींचा विळखा, झुकलेल्या वीजतारा, धोकादायक अवस्थेतील खांब आणि महावितरण कार्यालयातील सुधा झाडे वेल विळखा देखील पडला आहे .. देखभाली अभावी निर्माण झालेली परिस्थिती नागरिकांच्या जीवाशी खेळणारी ठरत असल्याचा आरोप होत आहे. सततच्या पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे तारा तुटणे, खांब कोसळणे किंवा विजेचा प्रवाह जमिनीवर उतरण्याचा धोका वाढला आहे. अशा परिस्थितीत निष्पाप नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि जनावरे यांचा जीव धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नागरिकांनी महावितरणकडे तातडीने राशीन परिसरातील सर्व वीज खांब, वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर आणि धोकादायक ठिकाणांचे विशेष सुरक्षा सर्वे क्षण करण्याची मागणी केली आहे. खांबांवरील वेली आणि झाडांच्या फांद्या त्वरित हटवाव्यात, जीर्ण व कमकुवत खांब बदलण्यात यावेत, सैल व झुकलेल्या तारा दुरुस्त कराव्यात आणि धोकादायक ठिकाणी इशारा फलक लावण्यात यावेत, अशी मागणीही होत आहे.

अपघात झाल्यानंतर पंचनामे करण्यापेक्षा, अपघात होणारच नाही यासाठी आताच उपाययोजना करा, असा संतप्त सूर नागरिकांनी व्यक्त केला आहे. पावसाळ्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये यासाठी महावितरण प्रशासनाने तातडीने व्यापक सुरक्षा मोहीम राबवून निष्काळजीपणा टाळावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# शेवगाव आगारातील नियोजनाचा बोजवारा

## पुणे बससेवा विस्कळीत, प्रवाशांचा संताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**अमरापुर :** शेवगाव आगारातून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या बससेवेचे नियोजन पूर्णपणे विस्कळीत झाल्याने गेल्या तीन-चार दिवसांपासून प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः पुणे मार्गावरील बससेवेत सातत्याने होत असलेल्या विलंब व फेऱ्या रद्द होण्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सोमवारी (दि. २०) पहाटे शेवगाव-पुणे मार्गावरील पहिल्याच बसमध्ये प्रचंड गर्दी झाली. आसनक्षमता पूर्ण झाल्याने अनेक प्रवाशांना बसमधून उतरावे लागले. त्यानंतर सकाळी ५.३० वाजता सुटणारी नियमित पुणे बस कोणतीही पूर्वकल्पना न देता रद्द करण्यात आली. परिणामी, प्रवाशांना पुढील ६.३० वाजताच्या बसची प्रतीक्षा करावी लागली.

यामुळे नोकरी, व्यवसाय, शैक्षणिक कामे, शासकीय कार्यालयातील नियोजित भेटी तसेच वैद्यकीय उपचारासाठी पुण्याकडे निघालेल्या अनेक प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. एका प्रवाशाला तातडीने उपचारासाठी पुण्यात पोहोचणे आवश्यक असतानाही बस उपलब्ध न झाल्याने त्याला मोठा मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागल्याचे प्रवाशांनी सांगितले.

यापूर्वी रविवारीही सकाळी ६.३० वाजताची बस रद्द झाल्याचा प्रकार घडला होता.

## शेख यांना राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार

**अहिल्यानगर :** नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना नगर तालुका तालिम सेवा संघाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार २५ जुलै रोजी निमगाव वाघा येथे आयोजित 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. आषाढी एकादशी व राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून स्व. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ बोधेगाव कडकडीत बंद



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** लडाखमधील पर्यावरण, स्थानिक हक्क आणि शैक्षणिक प्रश्नांसाठी आंदोलन करणारे सामाजिक कार्यकर्ते व शास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील उपोषणाची शासन स्तरावरून दाखल घेतली नसून २२ दिवसाचा कालावधी उलटल्याने त्या उपोषणाला पाठिंबा दर्शवित शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे पुरोगामी विचारांच्या संघटना, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिकांनी एकत्र येत काल सोमवार रोजी कडकडीत बंद पाळला. या आंदोलनातून केंद्र सरकारने वांगचुक यांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली. या वेळी हातगाव फाटा येथील डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक ते बोधेगाव पोलिस दूरक्षेत्रापर्यंत शांततेत निषेध मोर्चा काढण्यात आला.लोकशाहीचा आवाज दाबू नका,सोनम वांगचुक यांच्या मागण्या मान्य करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विशेष म्हणजे श्री शिवाजी हायस्कूलचे सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनीही या आंदोलनात मोठ्या सहभागी झाले होते. लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. आंदोलनादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

**विद्यार्थ्यांसह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची पोलिस चौकीसमोर निषेध सभा**

आंदोलनकर्त्यांनी लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांच्या मागण्यांवर संवाद साधण्याऐवजी दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. या आंदोलनाचे नियोजन वंचित बहुजन आघाडीचे शाहूराव खंडागळे यांनी केले होते. निषेध सभेत शाहूराव खंडागळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रकाश भोसले, सामाजिक कार्यकर्ते फिरोज पठाण, विठ्ठल तांबे, संगीताताई ढवळे ,अरुण झांबरे, मच्छिंद्र घोरतळे, बाबा पठाण, प्रमोद मिसाळ, भागवत भोसले यांनीही आपले विचार व्यक्त केले आहेत लोकशाही मूल्यांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि संविधानिक हक्कांसाठी जनतेने एकत्र येण्याची गरज व्यक्त केली.

असून या वेळी बन्सी मिसाळ,संतोष बाणाइत,बबन कुरेशी, अल्ताफ मणियार,शाहरुख पठाण, गौतम भोंगळे, दादासाहेब भोंगळे, माजी सरपंच विष्णू वारकड,प टेपट शेख, संदीप मिसाळ, नवनाथ मिसाळ, विठ्ठल वारकड, के टी टेलर, गोलू मिसाळ, आप्पा गायकवाड, गुलाब हुसेन, धोंडीराम मासाळकर, राजू डोंगरे, बापूलाल पठाण, नितीन पगारे, सतिष भोंगळे यांच्यासह असंख्य सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

# पॉश मशीनचा घोळ; खत-बियाणे विक्रीत अडथळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** तालुक्यात विविध भागांत पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी खत व बियाण्यांच्या खरेदीसाठी कृषी सेवा केंद्रांकडे मोठी धाव घेतली आहे. मात्र, कृषी विभागाच्या निर्देशानुसार पॉश (झेड) मशीनद्वारेच खत विक्री करण्याची सक्ती करण्यात आल्याने अनेक ठिकाणी मोठा गोंधळ उडाला आहे.

तांत्रिक अडचणींमुळे पॉश मशीन वारंवार बंद पडत असून व्यवहार पूर्ण होण्यास विलंब होत आहे. परिणामी कृषी सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. अनेक दुकानदारांचे कामकाज ठप्प होत असून शेतकरी आणि दुकानदार यांच्यात वादावादीचे प्रकारही वाढू लागले आहेत.पेरणीचा हंगाम सुरू असल्याने प्रत्येक दिवस महत्त्वाचा असताना केवळ मशीनवर अवलंबून राहण्याची सक्ती शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नेटवर्क समस्या, सर्व्हर डाऊन आणि मशीनमधील तांत्रिक बिघाडामुळे शेतकऱ्यांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.

दरम्यान, पेरणीच्या हंगामात पॉश मशीनच्या अडचणी दूर करून पर्यायी व्यवस्था उपलब्ध करावी, अशी मागणी कृषी सेवा केंद्र चालकांसह शेतकऱ्यांकडून होत आहे. अन्यथा खत-बियाण्यांचा पुरवठा विस्कळीत होऊन पेरणीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## माही जळगावात उपमुख्यमंत्री पवारांच्या जयंती कार्यक्रम नियोजनाची बैठक

**चापडगाव :** जिल्हा परिषद गट व भाजपा कर्जा तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य विधान परिषद सभापती आदरणीय राम शिंदे साहेब यांच्या हस्ते दिनांक २२ ७ २०२६ वार बुधवार नियोजन करण्यासाठी माहिजळगाव चौफुला येथे चापडगाव गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव खेडकर भाजपा कार्यकर्ते नंदलाल काळदाते व नऊ भाजपा किसान मोर्चा चे तालुका उपाध्यक्ष नवनाथ शिंदे भटक्या विमुक्त तालुका अध्यक्ष बापूराव शिंदे व श्री अशोकराव खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची बैठक पार पडली या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब व महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले असून या शिबिरामध्ये रक्तदात्याला उत्तम प्रतीचे ट्रॅक सूट व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# बालमनात रुजली विठ्ठलभक्ती!

## चिमुकल्यांच्या दिंडीने जपली संत परंपरेची ओळख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर राज्यभर विठ्ठलभक्तीचे वातावरण असताना तालुक्यातील धनगरवाडी येथील ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या दिंडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संतपरंपरा आणि वारकरी संस्कृतीची ओळख बालवयातच विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम संस्कार, संस्कृती आणि भक्तीचा सुंदर संगम ठरला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आदी संतांच्या वेशभूषेत सहभाग घेतला. डोक्यावर तुळशीची माळ, हातात टाळ, मृदंग आणि भगव्या पताका घेत चिमुकल्यांनी ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल अशा जयघोषात दिंडी काढली. त्यांच्या निरागस भक्तीने आणि उत्साहाने संपूर्ण शाळा परिसर विठ्ठलमय झाला.

यावेळी बोलताना शाळेच्या प्राचार्या प्रणिता मेंडसुरे यांनी सांगितले की, महाराष्ट्राची संतपरंपरा ही आपल्या संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. आधुनिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, अध्यात्म आणि सामाजिक मूल्ये रुजविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा उपक्रमांमुळे बालमनावर चांगले संस्कार होतात आणि आपल्या परंपरेबद्दल अभिमान निर्माण होतो.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर करत वारकरी परंपरेचा अनुभव घेतला. पालक आणि शिक्षकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. प्राचार्या प्रणिता मेंडसुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांच्या सहकार्याने हा संस्कारमय उपक्रम उत्साहात पार पडला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या दिंडीने विद्यार्थ्यांना केवळ आनंदच नाही तर महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेची जाणीव करून दिली.

**पुस्तकांसोबत संस्कारांचाही धडा !**

ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलने चिमुकल्यांच्या दिंडीद्वारे विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संतांचे विचार आणि भक्तीचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून शिकवले. आधुनिक शिक्षणासोबत संस्कृतीची जपणूक करणारा हा उपक्रम उपस्थितांची मने जिंकून गेला.

## मुंगीत वाळू तस्करांवर कारवाई २ डंपर, ट्रॅक्टरसह ३५ लाखाचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी गावातील नदीतून अवैध वाळू उपसा करणाऱ्या तिघा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून दोन जीसीबीसह ट्रॅक्टर असा सुमारे ३५ लाखाच्या मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस प्रमुख मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने केली. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, जिल्हा पोलीस प्रमुख सुदर्शनआदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.संतोष मुटकुळे यांचे मार्गदर्शनाखाली पो.उ.नि.सचिन दरवडे, पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, भिमराज खर्से, राहुल डोके, बाळासाहेब गुंजाळ यांचे पथक तयार करून अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या इसमांविरुद्ध कारवाई करणे कामी रवाना केले.दि.२० जुलै रोजी पहाटे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शेवगाव पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना अवैध धंद्यांची माहिती घेत असताना पथकास गुप्त बातमीदारामार्फत मुंगी गावातील नदीतील शासनाच्या मालकीच्या वाळूची चोरी करून भोन्याई देवी मंदिरासमोर सिमेंटच्या रस्त्यावर साठा केला आहे. काही इसम ते ट्रॅक्टरच्या लोडरच्या सहाय्याने डंपरमध्ये भरून बेकायदेशीरपणे वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली.

# श्रीरामपुरात वाढत्या गुन्हेगारीवर कठोर कारवाईचे संकेत

## अपर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता यांचा दौरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील वाढत्या गुन्हेगारीचा बिमोड करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था बळकट करण्यासाठी राज्य पोलीस प्रशासनाने अत्यंत कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. गुन्हेगारीचे केंद्र बनलेल्या श्रीरामपूर शहराला राज्याचे अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) निखिल गुप्ता यांनी भेट दिली.या उच्चस्तरीय दौऱ्यात त्यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या काही व्यक्तींवर आणि मुद्यांवर सखोल चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे.या महत्त्वाच्या दौऱ्यादरम्यान पोलीस दलातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभागाचे शिरीष जैन,विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्राचे संजय येनपुरे, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे उपविभागीय पोलीस



अधिकारी जयदत्त भवर आदी उपस्थित होते.

या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोमवारी सकाळी श्रीरामपूर पोलीस ठाण्यात एक महत्त्वाची बैठक घेत शहरातील गुन्हेगारीच्या मुळावर घाव घालण्यासाठी व्यूहरचना आखली. शहरात काही दिवसांपूर्वी आकाश दुबैय्या या व्यवसायिकाची किरकोळ कारणावरून भरदिवसा झालेली निर्घृण हत्या श्रीरामपूरसाठी एक मोठी हादरा देणारी घटना ठरली होती. या हत्येच्या निषेधार्थ आणि गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांच्या नेतृत्वात एक भव्य मोर्चा काढण्यात आला होता. या तीव्र संतापापोटी श्रीरामपूर शहर सलग चार दिवस, तसेच टाकळीभान, बेलापूर यांसारख्या ग्रामीण भागातील मोठी गावे पूर्णपणे बंद ठेवली गेली होती.

मोर्च्यादरम्यान आमदार हेमंत ओगले आणि प्रकाश चित्ते यांनी उघडपणे 'बेग टोळी' आणि 'जेधे टोळी' शहरात वाढत्या गुन्हेगारीस कारणीभूत असल्याचे सांगत काही पोलिसांची नावेही समोर आणली होती, ज्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर संबंधित टोळीकडूनही पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणाशी आपला संबंध नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले होते.

जनक्षोभ आणि वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी तात्काळ सूत्रे हाती घेत गुन्हेगारी विरोधात धडक कारवाया सुरू केल्या. पोलीस अधीक्षकांनी थेट जनतेशी सुसंवाद साधून त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण केले. शहरातील वाढती गुन्हेगारी आणि त्यावर अंकुश ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, युवा पिढीला विळखा घालणारी नशेखोरी आणि त्याचे वाढते प्रमाण,अवैध वाळू तस्करी आणि या अवैध धंद्यातून फोफावणारी गुन्हेगारी, अपर पोलीस महासंचालकांच्या या दौऱ्यामुळे श्रीरामपुरातील गुन्हेगारी वर्तुळात मोठी चलबिचल सुरू झाली असून, आगामी काळात पोलीस प्रशासन आणखी कडक आणि धडक कारवाई करण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.शहरातील प्रामुख्याने नगराध्यक्ष करण ससाणे, संजय फंड, प्रकाश चित्ते, वैशाली चव्हाण उपस्थित होते.

## फातेमा हाऊसिंग सोसायटीत धाड 1 लाखाचा गुटखा-मावा जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील फातेमा हाऊसिंग सोसायटीमधील एका बंगल्यात सुरू असलेल्या अवैध गुटखा आणि सुगंधी तंबाखू मिश्रित मावा विक्रीच्या अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकली आहे. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ८ हजार ५५८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, फातेमा हाऊसिंग सोसायटी येथील एका बंगल्यात आरीफ रहेमान तांबोळी हा व्यक्ती शरीरास अपायकारक असलेला प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधी तंबाखू मिश्रित मावा विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी छापा टाकला.

पोलिसांच्या तपासणीदरम्यान बंगल्याच्या कंपाउंडमध्ये मुद्देमाल जप्त केला असून यात सुगंधी तंबाखूमिश्रीत मावा १३५ किलो (किंमत: ६७,५०० रुपये),तंबाखूमिश्रीत इतर पदार्थ (किंमत: १२,०५८ रुपये),मावा तयार करण्याची मशीन २ नग (किंमत: १० रुपये),वजन काटा (किंमत: ५,००० रुपये),मोबाईल फोन (किंमत: १५,००० रुपये),एकूण जप्त मुद्देमाल: १,०८,५५८ रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आरोपी आरीफ रहेमान तांबोळी (रा. फातेमा हाऊसिंग सोसायटी, श्रीरामपूर) याच्याविरुद्ध कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## एनडीपीएस गुन्ह्यातील फरार आरोपीला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** बेलवंडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये दाखल असलेल्या गुन्ह्यातील फरार आरोपी आमिना शफी शेख (रा. विसापूर, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची नियुक्ती केली होती. या पथकात पोलीस अंमलदार फुरकान शेख, मनोज साखरे, प्रकाश मांडगे, प्रशांत राठोड तसेच चालक चंद्रकांत कुसळकर यांचा समावेश होता.दि. १८ जुलै रोजी बेलवंडी पोलीस ठाणे हद्दीत फरार आरोपींचा शोध सुरू असताना गुन्हा रजिस्टर क्रमांक २४६/२०२६ (एनडीपीएस ॲक्ट कलम ८(सी), २०(ब)) मधील पाहिजे आरोपी आमिना शफी शेख हा आपल्या राहत्या घरी आल्याची माहिती पथकाला मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तात्काळ छापा टाकत आरोपीला ताब्यात घेतले.अटक केलेल्या आरोपीला पुढील कायदेशीर कारवाई व तपासासाठी बेलवंडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, प्रकरणाचा पुढील तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत.

## कोंबडीच्या मोहाने बिबट्या अलगद पिंजऱ्यात जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील हिंगणी परिसरात बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेता वन विभागाने या परिसरात बिबट्या जेलबंद करण्यासाठी पिंजरा लावला होता. सोमवारी सकाळी ६ वा. दरम्यान पिंजऱ्यात ठेवलेली मृत कोंबडी बघितल्यानंतर बिबट्याला तिचा मोह झाला. तिला भक्ष करण्यासाठी त्याने पिंजऱ्यात प्रवेश केला आणि त्यातच तो जेरबंद झाला. बिबट्या जेरबंद झाल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. मागील काही महिन्यात देखील याच परिसरात बिबट्या जेरबंद करण्यात आला होता. आता हा दुसऱ्या बिबट्या या परिसरातून वन विभागाने ताब्यात घेतला आहे.

हिंगणी येथील पारधी वस्ती परीसरात डॉ. सौरव गोरक्षनाथ रोकडे यांच्या सर्वे नंबर ६४/१/२ मधील शेतात बिबट्या जेलबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात आला होता. या पिंजऱ्यामध्ये एक मृत कोंबडी ठेवण्यात आली होती. सकाळी भक्ष शोधण्याच्या नादात बिबट्या अलगद या पिंजऱ्यात अडकला. बिबट्या पिंजऱ्या बंद झाल्याची बातमी वन विभागाला सरपंच धनराज पवार व रामहरी चव्हाण यांनी दिली. वन विभागाचे अधिकारी श्रद्धा पडवळ व सागर इंदरखे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पोलीस पाटील कुमारपंडित पवार,



सरपंच धनराज पवार, रामहरी चव्हाण, अशोक गंगावणे सचिन पवार, अच्युत पवार, भरत मोरे, रतन सोनवणे, अशोक चव्हाण ,बेगू चव्हाण यांच्या मदतीने बिबट्याला घटनास्थळावरून आपल्या सोबत घेऊन गेले.

परिसरातील बिबट्या जेरबंद झाल्यामुळे अनेकांनी वनविभागाचे कौतुक केले.

## झरेकाठी येथे मोटरसायकलस्वारावर दोन बिबट्यांचा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथे मोटरसायकलवरून घरी चाललेले संदीप वाणी यांच्यावर दोन बिबट्यांनी अचानक झडप घालून हल्ला केला. या हल्ल्यात वाणी मोटरसायकलवरून खाली पडले. सदरची घटना सोमवारी सायंकाळी घडल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्याचवेळी तिथे एक बोलेरो गाडी अमाल्यामुळे दोन्ही बिबटे घाबरून जंगलात पळून गेले, ज्यामुळे एक मोठी दुर्दैवी घटना थोडक्यात टळली. या घटनेची माहिती तातडीने वनविभागाला देण्यात आली आहे. परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, तातडीने पिंजरा लावून या बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी आक्रमक मागणी झरेकाठी येथील जनसेवा युवा मंचचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे यांनी वनविभागाकडे केली आहे.

## तुळजाभवानी मंदिरात धाडसी चोरी दानपेटीतील रोकड लांबवली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव शिवारातील इंदिरानगर येथील जागृत तुळजाभवानी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केली आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचा कडी-कोंडा तोडून चोरट्यांनी दानपेटीतील संपूर्ण रोकड लंपास केली असून, वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये आणि भाविकांमध्ये तीव्र संताप व भीतीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिराला लक्ष्य केले. सकाळी साडेपाच वाजता नेहमीप्रमाणे भाविक दर्शनासाठी आले असता, मंदिराचा दरवाजा उघडा आणि दानपेटी अस्ताव्यस्त पडलेली आढळली. चोरट्यांनी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचा कोंडा तोडून आत प्रवेश केला आणि गाभाऱ्यातील दानपेटी फोडून रोकड पळवली. या घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अहिल्यानगर येथून श्वानपथक बोलविण्यात आले असून, कसून तपास सुरू आहे.

इंदिरानगर येथील हे तुळजाभवानी मंदिर परिसरातील भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे.



'नवसाला पावणारी देवी' म्हणून हे मंदिर अल्पावधीतच प्रसिद्ध झाले आहे.

## कर्जतच्या रेहकुरीत अवैध मुरूम उत्खनन

### वन अधिकाऱ्यांनी जेसीबीसह एकाला घेतले ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** वन्यजीव विभाग पुणे अंतर्गत रेहेकुरी वनक्षेत्रात गणेशवाडी (ता. कर्जत) येथे अनधिकृत आणि अवैध मुरूम उत्खनन केल्या प्रकरणी एका आरोपीस मुद्देमालासह वनविभागाने ताब्यात घेतले असल्याची माहिती रेहेकुरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी मारुती मुळे यांनी दिली. प्रशांत तात्यासाहेब गावडे (रा. बारडगांव सुद्रिक) यास जेसीबीसह ताब्यात घेतले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, कर्जत तालुक्यातील रेहेकुरी अभयारण्य वनक्षेत्रातील मौजे गणेशवाडी



गटक्रमांक २०१ मध्ये जेसीबी मशीनच्या सहाय्याने अनधिकृत आणि विना परवानगी मुरूम उत्खनन केल्याने वनपरिमंडळ वन गुन्हयाप्रमाणे ३१ मे २०२६ रोजी आरोपी प्रशांत तात्यासाहेब गावडे (रा. बारडगांव सुद्रिक) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यासंबंधी प्रशांत गावडे यास कुळधरणचे वनपाल यांनी विना परवानगी मुरूम उत्खनन का केले ? या चौकशी कामे तीन नोटीस बजावल्या होत्या. तीन नोटीस बजावून देखील वनपरिक्षेत्र कार्यालय रेहेकुरी या ठिकाणी चौकशी कामी हजर न राहिल्याने सोमवार, दि २० जुलै रोजी उपवनसंरक्षक वन्यजीव पुणे, सहायक वनसंरक्षक अहिल्यानगर स्थित पुणे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी रेहेकुरी यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने बारडगांव सुद्रिक येथील आरोपी गावडे याच्या राहत्या घरी जात सदर वन गुन्हयात वापरलेले जेसीबी मशिन जप्त करीत त्यास ताब्यात घेतले. या कारवाईत रेहेकुरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी मारुती मुळे, वनपाल ए.आर.भोसले, यु.पी. खराडे, पी.एस. उबाळे, वनरक्षक बी.एस. सुंबे, पी.एन. बिटके, एस.आर. वाकचौरे, श्रीमती एम.बी. शिंदे, व्ही.डी. नांदे, एस.सी. हिवराळे, ए.एम. नन्नवरे, ओ.सी. सपकाळ आदीं सहभागी झाले होते. यापुढे वनविभागाच्या हद्दीत अवैध उत्खनन करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा वनपरिक्षेत्र अधिकारी मारुती मुळे यांनी दिला.

## श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या पालखी

### प्रदक्षिणा दिंडीचे पंढरपुरात उत्स्फूर्त स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** आषाढी वारीनिमित्त नेवासा तालुक्यातील श्रीक्षेत्र देवगड येथील श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या पालखी क्षेत्र प्रदक्षिणा दिंडीचे सोमवारी पंढरपूर नगरीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'', ''पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'' आणि ''अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त''च्या अखंड जयघोषाने पंढरपूर नगरी भक्तिमय झाली. दिंडीत हजारो वारकरी व भाविक सहभागी झाले होते.

पंढरपूर येथील भीमा नदीकाठी असलेल्या देवगड संस्थानच्या मठातून गुरुदेव दत्त पीठाचे प्रमुख महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या उपस्थितीत पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला. प्रारंभी वेदमंत्रांच्या घोषात पालखीतील पादुकांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर झेंडेकरी, टाळ-मृदुंगाच्या गजरात हरिनामाचा घोष करणारे वारकरी, भजनी मंडळ, डोक्यावर तुळशीचे कलश घेतलेल्या महिला आणि पुष्पांनी सजविलेली पालखी अशा भक्तिमय वातावरणात दिंडीने ग्रामप्रदक्षिणा सुरू केली. भीमा नदीवरील पुलाजवळ गंगाजलाने पादुकांचे पूजन करून गंगामाईस साडी-चोळी अर्पण करण्यात आली. पंढरपूर शहरात प्रवेश करताच विविध चौकांतून पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. भाविकांनी पालखीतील पादुकांचे दर्शन घेत पूजन केले. विठ्ठल मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर महंत भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते आरती करण्यात आली.देवगडच्या पंढरपूर मठात झालेला रिंगण सोहळा भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. सुमारे तीन तास चाललेल्या पालखी प्रदक्षिणेची सांगता देवगड मठात महाआरतीने झाली. त्यानंतर उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी नारायण महाराज ससे, गणपत महाराज आहेर, रामनाथ महाराज पवार, संजय महाराज निथळे, लक्ष्मण महाराज नांगरे, बाळकृष्ण महाराज कानडे, तात्या महाराज शिंदे, गिरीजीनाथ जाधव, दादा महाराज साबळे, अमोल महाराज बोडखे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी व भाविक उपस्थित होते.





## गोवंशांची अवैध वाहतूक करणाऱ्या तिघांवर कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील बसस्थानक परिसरातील लोकसेवा हॉटेलजवळ पोलिसांनी गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या तिघांविरुद्ध कारवाई करत सात गोवंशासह तीन वाहने जप्त केली आहेत. या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार. सोमवारी सकाळी डायल-११२ वर कोपरगावहून वैजापूरकडे येणाऱ्या तीन वाहनांतून गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत कारवाई केली.

कारवाईदरम्यान महिंद्रा बोलेरो पिकअप (क्र. MH 16-CC-7483), मारुती कॅरी (क्र. MH17-



BY-8194) तसेच छोटा हत्ती (क्र. MH17-B¦-4805) ही तीन वाहने अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीत या वाहनांमध्ये एकूण सात गोवंश आढळून आले. पोलिसांच्या माहितीनुसार. सर्व जनावरे दोऱ्यांनी घट्ट बांधून अत्यंत अमानुष पद्धतीने वाहनांमध्ये कोंबून नेली जात होती.

या प्रकरणी पोलिसांनी हसम बाबुभाई शेख, मदेखा मेहताब पठाण आणि दीपक विजय सोलंके (तिघेही रा. कोपरगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात तीनही वाहने आणि सात गोवंशाचा समावेश आहे. जप्त वाहनांची अंदाजे किंमत ६ लाख १० हजार रुपये, तर सात गोवंशाची अंदाजे किंमत १ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.